बुधवार, 29 जून 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 295
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 29 JUNE 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-295 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-8 • PRICE-5

## सत्तासंघर्षात भाजपची उडी

### बहुमत सिद्ध करण्याचे आदेश देण्याची राज्यपालांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार अल्पमतात आल्याने सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगावे, अशी मागणी करणारे पत्र भाजपने मंगळवारी रात्री राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे सादर केले. शिंदे यांच्या बंडानंतर भाजपने प्रथमच या राजकीय लढाईत उडी घेतली. भाजपच्या मागणीनुसार राज्यपाल मुख्यमंत्र्यांना येत्या तीन दिवसांत विश्वासदर्शक ठराव मांडण्याचा आदेश देण्याची शक्यता आहे.**

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे मंगळवारी दिल्लीत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची भेट घेऊन रात्री मुंबईत परतले. त्यानंतर फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या शिष्टमंडळाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. शिवसेनेच्या ३९ आमदारांनी वेगळी भूमिका घेतली आहे. याशिवाय काही अपक्षांनी शिंदे यांना पाठिंबा दिला आहे. ४६ आमदारांनी वेगळी भूमिका घेतल्याने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकारने बहुमत गमावले आहे. त्यामुळे सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगावे, अशी मागणी भाजपने केली आहे.

शिवसेनेच्या बंडखोर आमदारांना धमक्या दिल्या जात आहेत. शिवसेना खासदार संजय राऊत हे धमकीयुक्त भाषा वापरत आहेत, याचा उल्लेख भाजपच्या पत्रात करण्यात आला आहे. शिवसेनेचे ३९ आमदार महाविकास आघाडीबरोबर नाहीत किंवा त्यांचा या सरकारला पाठिंबा नाही. या साऱ्या घडामोडींमुळे राज्यपालांना पत्र सादर केल्याचे फडणवीस यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. सरकार अल्पमतात आहे. विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मांडल्यास चित्र स्पष्ट होईल, असा दावा भाजपच्या वतीने करण्यात आला. आमच्या पत्रानुसार राज्यपाल उचित निर्णय घेतील, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**शिवसेना सर्वोच्च न्यायालयात जाणार : विनायक राऊत**



देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रानंतर राज्यपालांचे बहुमत सिद्ध करण्याचे पत्र प्राप्त झाल्यास शिवसेना सर्वोच्च न्यायालयात अर्ज करणार असल्याचे खासदार विनायक राऊत यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने आम्हाला तशी मुभा दिली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. अपात्र ठरविण्याच्या नोटिशींविरोधातील बंडखोर आमदारांच्या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी विश्वासदर्शक ठरावाचा मुद्दा आला होता. आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर निर्णय होत नाही तोपर्यंत विश्वासदर्शक ठराव घेऊ नये, अशी भूमिका शिवसेनेच्या वतीने मांडण्यात आली होती. ही सुनावणी झाली तेव्हा विश्वासदर्शक ठरावाचा कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. असा आदेश दिला तर आमच्याकडे या, असे न्यायालयाने म्हटले होते. यामुळे राज्यपालांनी बहुमत सिद्ध करण्याचा आदेश दिल्यावर पुन्हा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय शिवसेनेपुढे उपलब्ध असेल. शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेच्या संदर्भातील निर्णय होईपर्यंत विश्वासदर्शक ठराव मांडण्याची सक्ती करू नये, अशी शिवसेनेची भूमिका असेल.

#### राजीनामा की, विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाणार?

महाविकास आघाडीचे घटक पक्ष आणि अपक्षांचे संख्याबळ १७० होते. पण, शिवसेनेच्या ३९ आमदारांसह काही अपक्ष आमदारांनी शिंदे यांना साथ दिली आहे. यामुळे महाविकास आघाडीचे संख्याबळ घटले आहे. शिंदे यांच्या बंडामुळे सरकार गडगडणार, हे स्पष्ट आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे राजीनामा देणार की विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाणार, हा आता प्रश्न आहे. शिंदे यांच्याबरोबर असणारे काही आमदार मुंबईला आल्यावर आमच्याबरोबर राहतील, असा दावा शिवसेनेच्या वतीने करण्यात येत असला तरी सरकार टिकण्याची शक्यता धूसर आहे.

## सरकारी योजनांची जबाबदारी लवकरच सहकारी बँकांवर

### केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद :** सहकारी बँकांकडे सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी लवकरच दिली जाईल, अशी घोषणा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केली. येथे ते गुजरात राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (कृषी बँक) ७० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते.

शहा यांनी सांगितले, की आता सहकार क्षेत्र या सरकारी योजनांशी जोडले जाईल. त्यामुळे सरकारचा सर्वसामान्य व्यक्तींशी सर्वदूर व थेट संपर्क वाढेल. आतापर्यंत सरकारच्या आधार कार्ड-एटीएम-मोबाईलद्वारे थेट लाभ हस्तांतरण योजना (जेएएम-डीबीटी) राबवण्यात सहकार क्षेत्राचा संबंध नव्हता. परंतु आता सहकारी बँकांच्या माध्यमातून सरकारी योजनांच्या अंमलबजावणीचा निर्णय सरकारने घेतला आहे.

शहा म्हणाले, की 'डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर' (डीबीटी) योजनेतून निधी सरकारकडून जन धन खाते, आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांकाच्या (जेएएम) समन्वयातून लाभार्थीच्या बँक खात्यात जमा केले जातात. सरकारी अनुदानाशी संबंधित अनियमितता दूर करण्यासाठी सरकार जन धन



**आता सहकार क्षेत्र सरकारी योजनांशी जोडले जाईल. त्यामुळे सरकारचा सर्वसामान्य व्यक्तींशी सर्वदूर व थेट संपर्क वाढेल. सहकारी बँकांच्या माध्यमातून सरकारी योजना राबविल्या जातील.**
**अमित शहा, केंद्रीय सहकार मंत्री**


खाते, आधार आणि मोबाइल क्रमांक एकमेकांशी जोडू इच्छित आहे. सध्या ५२ मंत्रालये 'जेएएम'द्वारे लाभार्थींना मदत करण्यासाठी 'डीबीटी' अमलात आणत आहेत. अशा प्रकारे सुमारे ३०० सरकारी योजनांच्या लाभार्थींच्या खात्यावर थेट रक्कम पाठवली जाते. या वेळी त्यांनी थकबाकीदारांकडून १९० कोटी रुपये वसूल केल्याबद्दल गुजरातच्या या सहकारी बँकेच्या व्यवस्थापनाचे कौतुकही केले.

## बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिल्यास शिवसेनाही तयार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपने राज्यपालांना पत्र लिहून महाविकास आघाडी सरकारने बहुमत सिद्ध करावे, अशी मागणी केली आहे. आता सत्तासंघर्षात शिवसेनेनेही कंबर कसली आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना बहुमत सिद्ध करण्यास सांगितल्यास शिवसेनाही सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी करेल, असे सूत्रांनी सांगितले आहे. अपक्ष आमदारांचा गट राज्यपाल कोश्यारींना भेटणार आहे. आणि राज्यातील महाविका आघाडी सरकारचा पाठिंबा काढल्याचं कळवणार आहे, असे सांगण्यात येत आहे. यामुळे राज्य सरकार अल्पमतात येईल, असे बोलले जात आहे.

महाविकास आघाडीच्या सरकार स्थापनेवेळी याच अपक्ष आमदारांनी उद्धव ठाकरे यांना आपला पाठिंबा दर्शवला होता. यामुळे अपक्ष आमदारांनी पाठिंबा काढल्यास उद्धव ठाकरे यांना बहुमत सिद्ध करण्यास सांगण्यातशिवाय राज्यपाल कोश्यारींकडे कुठलाही पर्याय राहणार नाही.



राज्यपालांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना बुहमत सिद्ध करण्याचे निर्देश दिल्यास शिवसेना सुप्रीम कोर्टात जाईल, अशी माहिती खासदार अरविंद सावंत यांनी दिली. शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी दाखल केलेल्या याचिकेवरून सुप्रीम कोर्टाने १६ आमदारांच्या आपत्रतेवर १२ जुलैपर्यंत स्थगिती दिली आहे. सुप्रीम कोर्टाने 'जैसे थे स्थिती' ठेवण्याचे आदेश दिले आहेत. विश्वासदर्शक ठराव घेण्याबाबत कोर्टाने कुठलेही निर्देश दिलेले नाहीत. यामुळे राज्यपाल मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश देणार नाहीत, अशी अपेक्षा आहे. पण राज्यापालांकडून मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश आल्यास शिवसेना सुप्रीम कोर्टात जाईल, असे सावंत यांनी सांगितले.

## एकनाथ शिंदे आमदारांसह मुंबईत धडकणार



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी अखेर इतर आमदारांसह उद्या मुंबईत येणार असल्याची माहिती दिली आहे. आम्ही सर्व आमदारांना घेऊन बहुमत चाचणीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी मुंबईत जाणार आहोत. आमच्यासोबत असलेले सर्व आमदार उद्या मुंबईत पोहोचतील, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या अडचणींमध्ये मोठी वाढ झाली आहे.


एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी गुवाहाटी येथील कामाख्या देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर शिंदे यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. मी आताच कामाख्या देवीचे दर्शन घेतले आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या समाधानासाठी, सुखासाठी आणि समृद्धीसाठी मी देवीचे आशीर्वाद घेतले, असे ते म्हणाले.

## मसाप अंबाजोगाईचे साहित्य पुरस्कार जाहीर

### अमर हबीब, अलका वालचाळे व देविदास खोडेवाड यांचा होणार सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

अंबाजोगाई : मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईचे दर दोन वर्षांनी दिले जाणारे साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. हे पुरस्कार अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे दिवंगत संमेलनाध्यक्ष यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिले जातात. येत्या ऑगस्ट महिन्यात १० व्या साहित्य संमेलनात हे पुरस्कार वितरित केले जातील. मंदाताई देशमुख स्मृती कथा लेखक पुरस्कार अमर हबीब यांना, प्राचार्य डॉ. शैलताई लोहिया स्मृती लेखिका पुरस्कार प्रा. डॉ. अलका सरोदे - वालचाळे यांना तर प्राचार्य डॉ. संतोष मुळावकर शिक्षक साहित्य पुरस्कार प्रा. देविदास खोडेवाड यांना मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे व सचिव गोरख शेंद्रे यांनी जाहीर केले आहेत.








अमर हबीब हे मुक्त पत्रकार, शेतकरी आंदोलन, किसानपुत्र आंदोलन यात महत्वाचा सहभाग, परिसर प्रकाशनाच्या वतीने अनेक महत्वाचे ग्रंथ प्रकाशित केले आहेत. अनेक चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून नाते, कलमा, खरी कमाई हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. अंबाजोगाईची कथा या कथासंग्रहाचे संपादन केळलेला ग्रंथ ९ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात प्रकाशित करण्यात आले असून संवाद, आकलन, आदी लेख संग्रह आहेत तर धुनी तरुणाई हे चळवळी आधारित ग्रंथ संपादित केला आहे. त्यांना मंदाताई देशमुख स्मृती कथा लेखक पुरस्कार दिला जाणार आहे.

प्रा. अलका वालचाळे ह्यानी महिला महाविद्यालयात मराठीचे अध्यापन केले आहे. त्यांची समकालीन मराठी जैन कथा, जैन मराठी साहित्य - स्वरूप आणि आकलन व मराठी जैन काव्यधारा ही पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांना प्राचार्या डॉ. शैलाताई लोहिया स्मृती लेखिका पुरस्कार दिला जाणार आहे.

प्रा. देविदास खोडेवाड हे खोलेश्वर महाविद्यालयात मराठी भाषेचे अध्यापन करतात. त्यांचे महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन (संशोधन ग्रंथ), पुन्हा उलगुलान (कवितासंग्रह), जखमा (कवितासंग्रह) व वैचारिक मराठी साहित्य: शोध, स्वरूप व अभिव्यक्ती (संपादकीय) हे ग्रंथ प्रकाशित आहेत. त्यांना प्राचार्य डॉ. संतोष मुळावकर स्मृती शिक्षक लेखक पुरस्कार प्रदान केले जातील.

पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पहार व दोन हजार रुपये रोख असे आहेत. येत्या ऑगस्ट महिन्याच्या १९,२० व २१ तारखेला मसाप शाखा अंबाजोगाईचे १० वे अंबाजोगाई साहित्य संमेलन संपन्न होणार असून या संमेलनात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, अशी माहितीही मसाप अंबाजोगाई अध्यक्ष दगडू लोमटे यांनी दिली आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# मनोरथा चल त्या नगरीला...!

कर्नाटकमध्ये विजयनगर जिल्ह्यात होस्पेट ( ज्याचे नावही आता विजयनगर करण्यात आले आहे ) नावाचं छोटंसं गाव आहे. या होस्पेट गावाजवळ हंपी नावाचं ठिकाण आहे. माझे एक स्नेही श्री ए एम गुरुमूर्ती हे होस्पेटला राहतात. ते बऱ्याच वर्षांपासून आम्हाला त्यांच्याकडे यावं म्हणून आग्रही होते. अखेर ४ जून २०२२ ला तो योग जुळून आला. कर्नाटकातच बदामी येथे असलेली शाकंभरी देवी ही आमची कुलदेवता असल्याने तिच्या दर्शनासाठी आम्ही बदामीला गेलो. मी, माझी पत्नी सौ श्रद्धा, मुलगी सारिका आणि नातू स्वराज असे आम्ही चौघेजण कारने आधी सोलापूरला आणि मग दुसऱ्या दिवशी बदामीला गेलो. बदामीचा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. जवळच पट्टदकल आणि ऐहोळ येथील पुरातन मंदिरे व लेणी आहेत. आम्ही देवीचे दर्शन घेऊन बाहेर पडतो न पडतो तोच आम्हाला घ्यायला श्री गुरुमूर्ती सर होस्पेटहून तिथे हजर होते. गुरुमूर्ती सरांबद्दल मी पुढच्या भागात सविस्तर लिहिणार आहे. एक अतिशय लोभस आणि हवंहवंसं वाटणारं व्यक्तिमत्व म्हणजे गुरुमूर्ती ! त्यांच्यामुळेच हंपी हे पुन्हा एकदा पाहण्याचा योग जुळून आला. हंपी ही पूर्वी म्हणजे १४ व्या शतकात विजयनगर साम्राज्याची राजधानी होती. आज आपण जेव्हा हंपी बघायला जातो तेव्हा आज भग्नावस्थेत दिसणारे हे शहर एके काळी किती वैभवशाली असेल याची कल्पना येते. हंपी हे शहर तुंगभद्रा नदीच्या काठावर वसलेले आहे. याच शहराला पूर्वी पंपा किंवा किष्किंधा किंवा भास्करक्षेत्र म्हणून ओळखले जात होते. पंपा हे पूर्वी तुंगभद्रा नदीचे एक नाव होते. त्यावरूनच पुढे हंपी असे झाले असावे. यालाच विजयनगर किंवा विरुपाक्षपुरा असेही म्हटले जाते. हंपीत प्रवेश केल्यानंतर जागोजागी अजस्त्र शिळा आपल्या दृष्टीस पडतात. अजस्त्र शिळा असलेल्या टेकडया आहेत. हेच अतिभव्य असे पाषाण जागोजागी पण विखुरले आहेत. काही ठिकाणी त्यांच्या नैसर्गिक गुहा, आडोसा तयार झालेला आहे. त्याआधाराने काही लोक राहत आहेत.
हंपीत शिरताना मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूला दोन विशाल शिळांची कमान झालेली आपल्याला दिसते. यांना जुळ्या बहिणी असे म्हटले जाते. त्या जणू हंपी शहराचे संरक्षण करतात! देशी परदेशी पर्यटकांची प्रचंड गर्दी हे शहर पाहण्यासाठी नेहमीच असते. युनेस्कोने हंपीचा समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत केला आहे.
इ.स. १३३६ ते १५६५ या काळातील विजयनगर हे भारतातील अत्यंत वैभवशाली असे साम्राज्य होते. हरिहर आणि बुक्क या पराक्रमी आणि कर्तृत्वान बंधूंनी हे शहर वसवले होते. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### ब्रह्मस्वरूप चैतन्य जडाचे अशाश्वत रूप

आधुनिक केसरी

नव्यानं जन्माला आलेली प्रत्येक पिढी ही अनुकरणप्रिय असते. कलाकृतीचं शास्त्र आणि त्याचा वारसा जर आपणच पुढे चालू ठेवला तरच पुढील पिढी देखील अनुकरणीय कृतीतून आपल्या कलेच्या संकृतीचं जतन करेल. आधी केलं आणि मगच सांगितलं, असेच विचार, वर्तन आणि व्यवहार आपण अंगीकारत असल्यावर आपल्या पुढील अनेक पिढ्या प्रत्येक कलाकृतींच्या शास्त्राचा विचार, अभ्यास आणि त्यांचं जतन केल्याशिवाय राहणार नाही. साकारण्यात येणारी प्रत्येक कलाकृती ही विकृतीचं नाही तर आपल्या संकृतीचं दर्शन घडवून कलाकृतीच्या शास्त्राची जपणूक करत राहील. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक कलांचा संबंध आपल्या मानसिक स्वास्थ्याशी असल्याचं समजून घेतलं पाहिजे. आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणे आणि ते टिकवणे हे प्रत्येक शास्त्रीयदृष्ट्या आत्मसात केलेल्या प्रत्येक कलांच्या माध्यमातून शक्य होत असतं. एकप्रकारे आंतरिक उर्जा त्याद्वारे आपल्याला प्राप्त होत असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जगण्यापलीकडच्या जीवनाचा अनुभव दृश्य कलांमधून अभिव्यक्त होण्यासाठी विश्वातील दृश्य वस्तूंना आपल्या मनात प्रथम अनुभवत्व येऊन त्यांचं मनःप्रतिमांमध्ये रूपांतर व्हावं लागतं. प्रत्येक कलावंत आणि संस्कृती यांच्या मनोभूमिकेनुसार हे अनुभवरूप वेगवेगळे असल्याचं समजून घेतलं पाहिजे.
भारतीयांच्या विचारधारेनुसार विश्वातील ब्रह्मस्वरूप चैतन्य जडाचे अशाश्वत रूप घेऊन इंद्रियगोचर होतं. केवळ चैतन्य हेच अंतिम सत्य असल्याचं मानलं जातं. इंद्रियगोचर विश्व हे त्याचे बाह्यरूप अथवा प्रकृती किंवा माया असल्याचं देखील म्हंटलं जातं. ते निव्वळ वस्तूंचं वस्तुनिष्ठ दर्शन नसतं; तर वस्तुमात्रात सळसळणाऱ्या केवळ चैतन्याचं मनोमय दर्शन असतं. ह्याची जाणीव आपल्या प्रत्येकानं करून घेतली पाहिजे.



आधुनिक केसरी

### दुःखाचे सावट | दूर झाले ||

अंतरीचा भाव | जाणतो ईश्वर ||
तोच सर्वेश्वर | चराचरी ||१||

माझ्या मनी चाले | कल्लोळ नित्याचा ||
आणिक दुःखाचा | भार वाढे ||२||

गांजूनिया गेलो | संसारी तापाने ||
फुकाच्या व्यापाने | त्रस्थ झालो ||३||

थकोनिया येता | देवा तुझ्या दारी ||
सुखाची शिदोरी | गावली रे ||४||

देहाच्या गाभारी | नामाची पहाट ||
दुःखाणे सावट | दूर झाले ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।**
**नास्त्युद्यमः समो बन्धुः कुर्वाणो नावसीदति ।।**

**अर्थ :** माणसांच्या शरीरातील आळस हाच त्याचा महाशत्रु आहे. उद्योगाविना कोणी आप्त नाही. उद्योगी कधी क्षीणतेस प्राप्त होत नाही. भर्तृहरींनी या श्लोकात उद्यमशीलतेचे महत्व सांगीतले आहे. उद्योग हाच माणसाचा खरा मित्र आहे, तर आळस हा माणसाचा शत्रु आहे. म्हणून माणसाने नेहमी उद्योगशील असावे, असा आशय येथे अभिव्यक्त करण्यात आला आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

**||अष्टधा किंवा द्रुष्य||**

अनंत,अविनाशी परमात्मा सर्वत्र व्यापून आहे. पृथ्वी, आप,तेज,वायु आकाश यांचे
एकत्र नाव म्हणजे पंचमहाभूते होय . पण याचा नाश होऊ शकतो पण परमात्मा मात्र अविनाशी आहे. जे जे रूप आणि नाम आहे ते सगळे भ्रमरूप आहे. नामरूपांच्या पलीकडे असणारे जे परमात्मा स्वरूप रहस्य आहे ते मात्र ज्याचे त्याने ओळखावे. त्याचा अनुभव घ्यावा व निर्गुण निराकार परमात्म्याला शरणं जावे. पाच महाभूतें आणि तीन गुण मिळून आठ होतात अशा आठ प्रकारांचा अंमल आपल्या आयुष्यावर असतो म्हणून त्याला 'अष्टधा' किंवा द्रुष्य म्हणतात।




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

द्रुष्य हे नाशवंत आहे. वेद व श्रुतींचे असें सांगणे आहे की "निर्गुण ब्रम्ह द्रुष्याच्या पलीकडे रहाते. द्रुष्याचे कोणतेही धर्म त्यास लागू पडत नाही.
निर्गुण ब्रम्ह फक्त शाश्वत आहे. असे हे ब्रम्ह शस्त्राने तोडूता येत नाही, विस्तवाने जाळता येत नाही पाण्यात एकरूप होत नाही. वा-यानें उडत नाही. पडत नाही, जळत नाही, की झडूनही जात नाही ते घडवू म्हटले तर घडवले जात नाही. लपून रहात नाही. त्याला रंग नाही ,वास नाही. परंतु ते सदासर्वकाळ असल्याशिवाय रहात नाही. ते कधीच तुटत नाही. ते दिसत नसले तरी त्याचे अस्तित्व कायम जाणवते. ढोबळ मानाने विचार करता डोळ्यासमोर जे जे दिसते ते ते शाश्वत असे आपण मानतो. परंतु जे बुद्धीला उकलत नाही ते ते समजून घ्यावे. इंद्रियांना दिसत नाही ते ते पहावे. विवेक जागा ठेवावा.साधना करून सुक्ष्म ब्रम्ह पहाण्याचे अनुभवायला सामर्थ्य अंगात असावे याठिकाणी देहाचे कष्ट लागत नाही पण मनाचे कष्ट मात्र लागतात.

## गोरखनाथ : जीवनचरित्र

आधुनिक केसरी

म्हणून मला आताच यांची संगत सोडायला हवी. असा निश्चय करून मच्छिन्द्रने टोपलीतले मासे, टोपलीतच ठेवून तो हळूहळू तिथून निघून गेला.
मच्छिन्द्र समुद्रकिनाऱ्यापासून निघून शिवाचा जप करीत चालत चालत बद्रिनाथला पोहोचला. तिथे त्याने एक शांत जागा शोधली आणि तपस्येला सुरुवात केली.काही दिवस त्याने कंदमूळांचे सेवन केले. पण त्यानंतर तो आहारही सोडून दिला. कारन मच्छिन्द्रला माहित होते कि साधकाचं शरीर हे मगरीसारखं असतं. मगरीच्या शरीरावर जर शस्त्राने वार केला तर शस्त्र तुटून पडतं पण मगरीला काहीही होत नाही. याचप्रकारे ज्यांना जीवन जगण्याची अभिलाषा असते त्यांना कितीही ज्ञानरूपी अमृत पाजले किंवा धर्मोपदेश केला,त्यांना वैराग्याचे महत्त्व सांगितले तरी त्यांच्या मनावर किंचितही परिणाम होत नाही आणि त्यासाठीच माणसाने आसक्ति, अभिलाषा या दोन गोष्टींचा त्याग करायला हवा. या विचारांनीच बाल मच्छिन्द्रने तपस्येचा मार्ग अवलंबिला होता.



कालांतराने मच्छिन्द्राची तपश्चर्या बघून भगवान महादेव खूप प्रसन्न झाले. आणि ते भगवान दत्तात्रेयांना आपल्या बरोबर घेऊन बद्रिकाश्रम येथे भागीरथीच्या किनाऱ्यावर मच्छिन्द्र तपश्चर्या करीत होता तेथे आले. भगवान दत्तात्रेयांनी मच्छिन्द्रला विचारलं, "बाळ तूझं नांव काय?" आणि तू ही तपश्चर्या कशासाठी करीत आहेस? मच्छिन्द्रने त्यांना म्हटले कि, प्रथम आपण कुठून आलात आणि कोण आहात हे सांगितल्यास बरे होईल."भगवान दत्तात्रेय म्हणाले. "माझे नांव दत्तात्रेय आहे आणि तूझी तपश्चर्या बघून तुला वर देण्यासाठी मला तुझ्याकडे यावे लागले," एवढे ऐकल्यावर मच्छिन्द्रने दोनही हात जोडून त्यांना वंदन केले, आणि वर मागितला. भगवान दत्तात्रेय 'तथास्तु' झाले. वरदान मिळताच मच्छिन्द्रचे शरीर धष्टपुष्ट झाले. नंतर भगवान दत्तात्रेयांनी मच्छिन्द्रच्या कानात एक मंत्र सांगितला. आणि त्याला 'नाथ'पंथाची दीक्षा देऊन त्याला आपला शिष्य बनविले आणि स्वतः गुरु झाले.नाथ पथांची दीक्षा दिल्यानंतर भगवान दत्तात्रेयांनी मच्छिन्द्रला आपल्या बरोबर घेऊन ते दोघे भगवान महादेवाकडे गेले. भगवान महादेवांना बघताच मच्छिन्द्रने त्यांच्या पायावर लोटांगण घातले. **(क्रमशः)**



# गुणिजन गौरव महासंमेलनात हर्ष कुंडलवाडीकर यांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** रविवार, दि. २६ जून २०२२ रोजी मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गुणिजन गौरव महासंमेलन आणि पुरस्कार वितरण सोहळा मुंबई शहरातील सांस्कृतिक सभागृहात थाटात संपन्न झाला. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी यांच्या वतीने दादर येथील दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राजस्तरीय गुणीजण गौरव महासमेलनात सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कुंडलवाडी येथील पत्रकार,नगरसेवक प्रतिनिधी हर्ष कुंडलवाडीकर यांना राज्यस्तरीय कुशल नेतृत्व जननायक लोकगौरव पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.
महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील २५ क्षेत्रांतून पुरस्कारासाठी निवडलेल्या मानकऱ्यांना या सोहळ्यात मानाचा फेटा, मानकरी बॅच, महावस्त्र, गौरवपदक, सन्मानचिन्ह आणि मानपत्र या स्वरूपात राज्यस्तरीय तसेच राष्ट्रस्तरीय पुरस्कार थाटात प्रदान करण्यात आले. सुप्रसिद्ध इंटरनॅशनल टॅलेंट आयकॉन डॉ. जयलक्ष्मी सानिपीना राव या सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून ऑनलाईन उपस्थित होत्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही घटनाकारांनी दिलेली संविधानमूल्ये गुणिजनांनी प्राणपणाने जपावीत, असे आवाहन संस्थापक अध्यक्षांनी आपल्या बीजभाषणात केले. सुप्रसिद्ध समाजसेविका आणि समुपदेशिका सौ. मिनाक्षी गवळी या समारंभाच्या मार्गदर्शक होत्या. समारंभाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध प्रेरक वक्त्या सौ. मनिषा कदम यांनी केले. गुणिजन परिवाराचे पदाधिकारी प्रकाश सावंत, लक्ष्मणराव दाते, अमोलराव सुपेकर यावेळी उपस्थित होते. कुंडलवाडीकर यांना मिळालेल्या पुरस्कारा बद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा यशस्वी होऊ शकतात : योगेश गायके

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** येथील मॉडेल डिग्री कॉलेज मध्ये दिनांक 25 जून रोजी बीए बीकॉम बीएस्सी तृतीय वर्षाच्या च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून घनसावंगी पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी योगेश गायके हे होते.
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की" ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेच्या युगात स्वतःची क्षमता सिद्ध करून यशस्वी होण्याची धमक आहे नियमित आणि निरंतर अभ्यास केल्यास यश हमखास मिळते, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात विद्यार्थ्यांनी शिस्त संयम आणि जबाबदारीने वागावे. परिस्थितीची जाण आणि भान ठेवून मार्गक्रमण केल्यास विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. प्रबोधन परक व देशभक्ती पर गीत गायनाने त्यांनी विद्यार्थ्यांची दाद मिळविली. तसेच सुप्रसिद्ध गायक, कीर्तनकार श्री. किशोर महाराज दिवटे यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि सुंदर गीत गायनाने सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की" विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी यशस्वी व्यक्तींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याची गरज आहे. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण घनसावंगी सारख्या वस्ती, वाडी तांड्यावरील विद्यार्थीसुद्धा शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी होऊ शकतात यासाठी उच्च आदर्श डोळ्यासमोर ठेवावा" प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. बालासाहेब सोनवणे यांनी केले,आभार डॉ. ऋषीं बाबा शिंदे यांनी तर सूत्रसंचालन डॉ कन्नूलाल विटोरे यांनी केले.
यावेळी डॉ.भीमराव पुंडगे, प्रा.उदय पवार, प्रा.खंडू नवखंदे, प्रा.भागवत गोरे, प्रा.बाळासाहेब वरखडे,डॉ.शरद सुबुगडे, डॉ. विठ्ठल लोंढे डॉ. अनिल तुपकर, प्राध्यापक डॉ. सुधीर कुमार राठोड, प्रा. शरद बागडे, दीपक कांबळे, गणेश सूरासे, नेमिणाथ मुळे, सतीश ब्रहामने, तसेच मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थी उपस्थित होते.



# ना. अब्दुल सत्तार यांना तालुक्यातील मातंग समाजाच्या वतीने पाठिंबा

## सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर यांनी दिली प्रसारमाध्यमांना माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवसेनेच्या विरोधात राज्याचे नगरविकास मंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडखोरांच्या गटात सिल्लोड-सोयगांव विधानसभेचे आमदार तथा नामदार अब्दुल सत्तार हे देखील असून राज्याच्या विकासासाठी आणि सोबतच मतदारसंघात विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी मिळणाऱ्या निधीत घटक पक्षाकडून वेळोवेळी निर्माण होणारे अडथळे, मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी न मिळणारी वेळ यांमुळेच त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे असे अब्दुल सत्तार यांचे म्हणणे आहे. म्हणून त्यांच्या या निर्णयाला सिल्लोड-सोयगांव विधानसभा मतदारसंघातील तमाम मातंग समाजाचा पाठिंबा व्यक्त केला असून, साहेब जो निर्णय घेतील त्यास, आमचा पूर्ण पाठिंबा असेल आणि मतदार संघातील संपूर्ण मातंग समाज सदैव ना.सत्तार यांच्या पाठीमागे राहिल असा एकमताचा निर्णय मातंग समाजाने घेतला आहे, असे प्रतिपादन क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेचे युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा अब्दुल सत्तार यांचे कट्टर समर्थक संदीप मानकर यांनी केले आहे.





आमदार सत्तार यांनी सिल्लोड-सोयगांव मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास साधला आहे.
तालुक्यातील प्रत्येक सर्कल आणि विभागाचा विचार केला तर अनेक विकासकामे त्यांनी मार्गी लावले असून ते सिल्लोड सोयगाव तालुक्याचे खरे विकासमहर्षी ठरले आहेत. त्यांचा विकासात्मक राजकीय संघर्ष हा तालुक्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असून सर्वच समाजाला एकत्र घेऊन चालण्याची धमक त्यांच्यामध्ये असल्यानेच ते कायम अपराजित विकास योद्धा राहिले आहेत. कोरोना सारख्या महाभयंकर महामारी काळात सुदृढ आरोग्य, रुग्णांची सुविधा, गोर-गरिबांना रेशन किटचे वाटप, डॉक्टर आपल्या दारी, जिल्हा परिषद आपल्या दारी असे अनेक समाजोपयोगी उपक्रम घेऊन त्यांनी तालुक्यातील जनतेला मदत केली आहे. आणि कठीण काळात सुद्धा कायम सोबत आहेत.
तालुक्यातील अनाड सारख्या खेडेगावांतील 25 कुटुंबाची वस्ती तब्बल 30 वर्षांपासून सर्वच मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचीत आणि अंधारात खितपत पडलेली होती. यांवेळी तेथील वंचितांनी राज्यमंत्री सत्तार साहेबांकडे या गोष्टींची मागणी केली असता त्यांनी नागरिकांना शब्द दिल्याप्रमाणे खरोखरंच 10 दिवसांत त्या बरड वस्तीवर वीज आणली आणि वस्ती प्रकाशित केली एवढेच नव्हे तर जिल्हाधिकारी सुनील चव्हाण आणि सर्वच महसूल यंत्रणेला सोबत घेऊन एकाच रात्री त्या 25 कुटूंबियांना विजेसोबतच, रेशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, स्वतंत्र सार्वजनिक विहीर दिली व इतकेच नव्हे तर गांवच्या विकासासाठी सुद्धा भरघोष निधी दिला. म्हणून त्यांच्यासारखा प्रामाणिक नेता आपल्या सोबत असणे हे आम्ही आमचे भाग्य समजतो. असे मत संदीप मानकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.
यांमुळेच तालुक्यातील मातंग समाजाच्या वतीने आम्ही वज्रमूठ बांधून आपल्या कायम सोबत आहोत. तुम्ही ठरविलेले धोरण आणि तुम्ही बांधलेले तोरण हेच आमच्यासाठी अंतिम राहील सर्व जनता कायम तुमच्या पाठीशी असून तुम्ही आपल्या राजकीय कारकिर्दीत प्रचंड संघर्ष पाहिले आहेत आणि म्हणूनच या संकटाला सुद्धा तुम्ही सामोरे जाऊन नक्कीच विजय पटलावर आपले नाव लिहाल अशी आम्हांला खात्री आहे...! असा विचार समाज बांधवांनी यावेळी व्यक्त केला.




# मिसारवाडीत वीज पुरवठा करणाऱ्या वाहीनीत नेहमी स्पार्कींगने जीवास धोका, विजेच्या तारा बदलण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मिसारवाडी भागातील कादरीया काँलनी गल्ली नं.७ मुख्य रस्त्यावर वीजेच्या तारा रस्त्यावर लोंबकळत असल्याने जीवाचा धोका निर्माण झाला आहे. महावितरणच्या कार्यालयात लेखी तक्रार करुन सुध्दा या विजेच्या तारा बदलण्याची कार्यवाही केली नसल्याने पावसाळ्यात आणखी धोका निर्माण झाल्याने येथील रहीवाशी भयभीत झाले आहे. येथील रहीवाशी शेख हिशाम शेख जब्बार यांनी सांगितले पाऊस सुरु झाला तर या तारेतून स्पार्कींग होते व परिसराचा विद्युत पुरवठा खंडित होतो. महावितरणचे कर्मचारी तारा थातूरमातूर जोडतात नंतर तीच परिस्थिती उदभवते. अनेकदा माझ्या घराला आग लागल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. येथे एक दवाखाना व मेडीकल आहे नेहमी रुग्ण उपचारासाठी महीला व लहान बालके येतात. या घटनेमुळे जीवाचा धोका वाढला आहे.
रस्त्यावर जाणा-या वाहनांना सुध्दा आग लागण्याची भीती वाटते तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लोंबकळणा-या तारांचा बंदोबस्त करुन नागरीकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे. दुरुस्ती लवकर झाली नाही तर आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावेळी आबेदा बेगम युसुफ पठाण, शमीम बाजी, मोहसीन खान व रहीवाशी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## विखे पाटलांचे भाकित

आधुनिक केसरी

शिवसेना पक्षामध्ये एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे असे दोन गट पडल्यानंतर राज्यात नाट्यमय घडामोडी घडत आहेत. आतापर्यंत हा वाद फक्त शिवसेना पक्षामध्येच सुरु होता. मात्र आता भाजपा ॲक्शन मोडमध्ये आला असून विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणीस यांनी महाविकास आघाडी सरकारला महुमत सिद्ध करायला लावावे, अशी मागणी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली आहे. या सत्तानाट्यामध्ये भाजपाने उडी घेतलेली असताना भाजपाचे नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठे भाकित केले आहे. येणाऱ्या आषाढीला विठ्ठलाची पूज देवेंद्र फडणवीस हेच करतील. देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र याला पर्याय नाही, असे विखे पाटील म्हणाले आहेत. महाविकास आघाडी सत्तेतून पायउतार होईल अशी भावना सामान्य जनता तसेच भाजपा कार्यकर्त्यांच्या मनात आहे. त्यामुळे येणाऱ्या आषाढीला देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री असतील आणि तेच आषाढीची पूजा करतील. देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र याशिवाय आता पर्याय नाही. कायदेशीर बाबींवर विचार झाला आहे. हा दोन गटांतील वाद आहे. सर्वोच्च न्यायालयाने यामध्ये लक्ष घातले आहे. लवकरच हा विषय मार्गी लागेल, असे विखे पाटील म्हणाले. शिवसेनेचे अस्तित्व महाराष्ट्रात संपत आहे. जी स्वाभिमानी मंडळी आहेत ती एकनाथ शिंदे यांच्या निमित्ताने पुढे येत आहेत. राज्याला चांगलं सरकार देण्याची तयारी झाली आहे. भाजपा सध्या वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे. विधानसभा निवडणुकीत जनाधार भाजपा आणि शिवसेनेला मिळाला होता. महाविकास आघाडी सरकार हे विश्वासघाताने तयार झाले होते. आता तेच विश्वासघाताबद्दल बोलत आहेत, अशी खोचक टीकादेखील विखे पाटील यांनी केली आहे. दरम्यान, देवेंद्र फडणीस यांनी दिल्लीमध्ये भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची चर्चा घेतल्यानंतर मुंबईत परतताच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. या भेटीमध्ये त्यांनी महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आले असून बहुमत चाचणी केली जावी, अशी मागणी राज्यपालांकडे केली आहे. यावेळी फडणवीस यांच्यासोबत विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, भाजपाचे आमदार आशिष शेलार, भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील आदी नेते उपस्थित होते. तर दुसरीकडे अजूनही वेळ गेलेली नाही. परत या. समोर बसून चर्चा करुया, अशी भावनिक साद शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोर आमदारांना केली आहे. त्यामुळे आगामी काळात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

## पुरोगामी वाचाळवीरांना सुप्रीम चपराक !

आधुनिक केसरी

**नुकतेच सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार नेमलेल्या समितीच्या अहवालावर सुप्रीम कोर्टाने गुजराथ दंगलीबाबतचा निर्णय देताना पंतप्रधान मोदी यांना निर्दोष घोषित केले आहे. हा निर्णय देताना तिस्ता सेटलवाड यांनी जाफरी या खासदाराच्या पत्नीच्या भावनांचा गैरवापर केला असा आरोप खुद्द सुप्रीम कोर्टाने केला आहे. काँग्रेस पुरस्कृत एका NGO या बाईंनी स्थापन करून त्याला justice for gujrath riot victim असे गोंडस नाव देत हिंदू द्वेषाचा अजेंडा चालवला जात होता तो यानिमित्ताने सुप्रीम कोर्टाने उघडकीस आणला आहे.**

योगायोगाने एके काळी देशाच्या एका पंतप्रधान असंलेल्या व्यक्तीला अलाहाबाद हायकोर्टाने दोषी घोषित केल्यावर त्या व्यक्तीने आणि त्यांच्या पक्षाने संपूर्ण देशाला वेठीस धरून लोकशाहीचा गळा घोटण्याचा निर्लज्ज प्रयत्न केला त्या २५ जून १९७५ या काळ्या दिवसाला आज ४७ वर्षे पूर्ण होत असताना हा निकाल आला आहे.

गोध्रा रेल्वे स्टेशनवर रामभक्त कारसेवकांनी भरलेला संपूर्ण डबा जाळून मारणारे धर्मांध वृत्तीच्या मंडळींविरोधात संपूर्ण हिंदू समाज पेटून उठला आणि त्यातून गुजरातमध्ये ती प्रसिद्ध दंगल घडली ! योगायोगाने नरेंद्र मोदी त्यावेळी तेथील मुख्यमंत्री होते आणि जणू काही त्यांनीच दंगल घडवली आशा प्रकारच्या चौकशा त्यांच्या मागे UPA सरकारने लावल्या. काँग्रेस नेते, संजीव भट सारखे IPS अधिकारी आणि तिस्ता सेटलवाडसारखे स्वयंघोषित ACTIVIST यांनी संयुक्त पणे एक षडयंत्र रचले आणि मोदी यांना एका क्लपोकल्पित गुन्ह्यात गोवण्याचे प्रयोग सुरू झाले.

गोध्रा येथे घडलेले भयानक हत्याकांड या तमाम पुरोगामी, लुटीयन्स यांच्या खिजगणतीतही नव्हते जणू तेथे मृत्युमुखी पडली ती माणसे नव्हती असा एकंदर पावित्रा होता. 'मौत का सौदागर'सारखी शेलकी शिवीगाळ मोदींना वापरली गेली. मोदींना मारायला गेलेले अतिरेकी गौरवण्यात आले. इशरत जहाँ या लोकांची निरागस बहीण बनली. मोदींच्या मुख्यमंत्री असताना आठ-आठ तास चौकशा झाल्या. त्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा पद्धतशीर वापर केला गेला. आज ED बद्दल गळा काढणारे अर्थात हे विसरून जातात.

ही सगळी मंडळी येथेच थांबली नाहीत. अमेरिकेच्या सिनेटला पत्र लिहून मोदींनी व्हिसासाठी अर्जही केलेला नसताना त्यांना व्हिसा देऊ नये असे पत्र लिहले. (आज बाईडन स्वतःहून मोदी यांच्याशी हस्तांदोलन करतानाचे फोटो आणि व्हिडीओ बघून किती जणांच्या पोटात दुखायला लागले असेल माहीत नाही, अर्थात हा काळाचा आणि कर्तृत्वाचा महिमा आहे) यात भारतीयाची आणि ज्यांनी विशेषतः मोदींना पुन्हा निवडून दिले त्या गुजराती बांधवांची बदनामी होते आहे, आपल्या भारताची बदनामी होत आहे याचे साधे भान या द्वेष्ट्याना नव्हते. या बनावट कथानकावर पटकथा लिहिल्या गेल्या, सिनेमे निघाले आणि या सर्व माध्यमातून मोदी यांना खलनायक ठरवताना तथाकथित हिंदू किंवा भगव्या दहशतवादाचे एक खोटे चित्रीकरण लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला गेला. गुजरातमध्ये झालेला विकास, सत्तेतून सामान्य माणसाच्या



उत्कर्षासाठी केलेले प्रयत्न, लोकाभिमुख धोरणे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. या कटकारस्थानात दिल्ली स्थित त्यावेळची राजकारणी मंडळी, दिल्लीत लाभार्थी बनलेले लुटीयन्स पत्रकार आणि तथाकथित ऍक्टिव्हिस्ट यांची अभद्र युती सामील होती.

कुणाला पद्मश्री, कुणाला आणखी काही पुरस्कार दिले गेले. (तिस्ताबाईंना पद्मश्री पुरस्काराखेरीज काँग्रेसकडून राजीव गांधी सद्भावना पुरस्कार, तर कुवेत येथील मुस्लिम समुदायकडून पुरस्कार मिळाला होता हे विसरून चालणार नाही !) हिंदुत्व आणि मोदी याना विरोध करणे हाच जणू त्यावेळी पुरस्कार देण्याचा आणि मिळण्याचा महत्वाचा निकष होता. परदेशात भारतीय शिष्टमंडळ जाताना हे आणि यांच्या नातेवाईकांची खोगीर भरती असायची. त्यावेळच्या केंद्र सरकारच्या रिमोट कंट्रोल असणाऱ्या आणि ज्यांचा या देशाच्या संस्कृतीशी कुठल्याही प्रकारचा भावनिक नाते नसणाऱ्या व्यक्तीची एक सल्लागार समिती होती ज्याचे हे सगळे सल्लागार होते त्यात तिस्ता सेटलवाड नावाच्या बाई होत्या.

या तिस्ताबाई म्हणे एक सामाजिक कार्यकर्त्या आहेत ! त्यांचा जुहू येथे जवळजवळ अमिताभ बच्चन यांच्या तिप्पट मोठा बंगला आहे. मोदी यांचे केंद्रात सरकार आल्यावर सगळ्या NGO ना ऑडिट रिपोर्ट दाखल करायला सांगितले. या बाईंच्या संस्थेच्या खर्चात ब्युटी पार्लर आणि चॉकलेटचे खर्च पण दाखवले गेले होते. या बाईंना हाताशी धरून जो काही तमाशा सोनिया गँगने केला त्याचा पर्दाफाश सुप्रीम कोर्टाने नुकत्याच निकालात स्पष्ट केला आहे.

तिस्ताबाईंना अटक झाल्यावर ज्या पद्धतीने परदेशातील वृत्तपत्रे आणि माध्यमे यांनी प्रतिक्रिया दिल्या त्यावरूनच या सगळ्या तथाकथित ऍक्टिव्हिस्ट मंडळींचे बोलविते धनी कोण हे लक्ष्यात येऊ शकते.

भारतात ही काही घडले की सगळ्यांना आणीबाणी आणि हुकूमशाहीची आठवण येते त्यावेळी तोंड बंद करून लाभार्थी बनलेले चाटुकार पत्रकार पण आणीबाणी चे नाव घेतात पण ते हे विसरतात ज्यांच्यावर हुकूमशाहीचा आरोप करतात त्याच मोदी आणि ते ज्या विचारांचे प्रतिनिधित्व करतात त्यांच्या त्यागामुळेच आज आपण घराणेशाही आणि हुकूमशाही या दोन्ही संकटातून मुक्त श्वास घेऊ शकत आहोत !

अमीतभाई शहा याना स्मिता प्रकाश यांनी मुलाखतीत क्लीन चिटबद्दल विचारल्यावर त्यांनी दिलेली तात्काळ प्रतिक्रिया फार महत्वाची आहे. गुन्हा घडला तर त्यात एखादा आरोपी आहे अथवा नाही याबद्दल क्लीनचिट शब्द योग्य आहे, पण येथे तर गुन्हा घडलाच नव्हता आणि त्यामुळे अशा ठिकाणी क्लीनचिटचा प्रश्न येतो कुठून? हा त्यांचा प्रतिप्रश्न होता जो हे षडयंत्र उघड करणारा होता ! त्यामुळेच असे षडयंत्र रचणाऱ्या मंडळींना गुन्हेगार ठरवण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आणि सिस्ता बाईंना अटक होण्याची नामुष्की सहन करावी लागली.

म्हातारी मेल्याचे दुःख नसते, काळ सोकावतो ! UPA च्या काळात हा काळ सोकावल्यामुळे साध्वी प्रज्ञा, कर्नल पुरोहित या सर्वानाच खूप सहन करावे लागले, पण सत्य हे पराभूत होत नसते पण, काही दिवस सत्याला त्रास सहन करावा लागतो तो त्रास आणि ती वेळ काळरात्रीसारखी असते, पण शेवटी सत्याची पहाट उगवतच असते आणि त्यातून सगळे जळमटे जळून पुन्हा एक आल्हाददायक वातावरण निर्माण होत असते. भारतमातेच्या ललाटी भाग्याचा उत्कर्ष निर्माण होऊ पाहत आहे याचे हे प्रसादचिन्ह म्हणावे लागेल ! यातून राजदीप ते रविश सारखे पत्रकार आणि तिस्ता सारखे पुरोगामी ऍक्टिव्हस्ट काही शिकतील अशी सुतराम शक्यता नाही कारण शेवटी सुम्भ जळाला तरी पीळ सुटत नाही हेच खरे !



विजय सुर्यवंशी
संपर्क क्र : 9168314090

## युवा वर्गातील वाढती व्यसनाधीनता

आधुनिक केसरी

**भारतात विचित्र स्थिती पहावयास मिळते. किशोरवयींन लहान मुलांपासून ते युवकापर्यंतचे सर्वच घुटखा, मावा, तंबाखू, सिगारेट, बिडी, चरच, गांजा, ड्रग्स अशा विविध पदार्थांचे सेवन करून रस्त्यावर पचापच थुंकतांना दिसतात. अशी व्यसनाच्या जाळ्यात अडकलेली युवा पिढी देशाचे भवितव्य कसे ठरू शकेल हाच गंभीर प्रश्न आज जगासमोर निर्माण झाला आहे.**

**हातात हात घालून**
**हदयास हदय जोडून**
**बंधू सहाय्याला लाहो**
**बलसागर भारत होवो**
**- साने गुरुजी**

आज आपण २१ व्या शतकात पदार्पण करत आहोत. आपला भारत देश विश्वगुरू होण्याच्या शर्यतीत एकेक पाऊल पुढे टाकत आहे. या २१ व्या शतकात "युवा वर्गातील वाढती व्यसनाधीनता" यासारखा निबंध लिखानाचा विषय ठरावा. यासारखे दुर्देव कुठेच नसेल.

जगातील सर्वात जास्त युवक असलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. कारण १८ ते ३५ या वयोगटातील ५५ टक्के युवक भारतात आहे. हा युवकवर्ग निरोगी, विवेकी, सुदृढ, विज्ञाननिष्ठ, व्यसनमुक्त असणे हीच देशाची खरी ताकद आणि यश आहे. परंतु भारतात विचित्र स्थिती पहावयास मिळते. किशोरवयींन लहान मुलांपासून ते युवकापर्यंतचे सर्वच घुटखा, मावा, तंबाखू, सिगारेट, बिडी, चरच, गांजा, ड्रग्स अशा विविध पदार्थांचे सेवन करून रस्त्यावर पचापच थुंकतांना दिसतात. अशी व्यसनाच्या जाळ्यात अडकलेली युवा पिढी देशाचे भवितव्य कसे ठरू शकेल हाच गंभीर प्रश्न आज जगासमोर निर्माण झाला आहे.

शाळा, महाविद्यालयाच्या १०० मीटरच्या परिसरात मद्य विक्री, दारू, सिगारेट, बिडी, तंबाखू, घुटखा विकण्यास शासनाने बंदी घातली आहे. तसा प्रतिबंध कायदा देखील २००३ साली शासनाने लागू केला आहे. परंतू शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात आसपास मोठ्या प्रमाणात बिडी, तंबाखू, घुटखा, सिगारेट आज ही विकला जात आहे. याचा परिणाम शिक्षण घेणाऱ्या युवा पिढीवर मोठ्या प्रमाणात होतांना दिसून येत आहे. अनेक शाळा , महाविद्यालयाच्या परिसरात घुटख्याच्या पाकिटाचा मोठ्या प्रमाणात कचरा झालेला आपणास दिसून येतो. याशिवाय बेकायदा दारू आणि घुटखा विक्री थांबविण्यास शासनाचे नाकार्तेपण दिसून येते. अवैध दारू विरोधी समित्या तालुकानिहाय स्थापण्याचे परिपत्रक गृहखात्याने २००४ मध्ये काढले होते. पण अद्याप कुठे ही अशा समित्या स्थापन झालेल्या आपणास दिसून येत नाही.



सिगारेट, बिडी, चिलीम ओढणे म्हणजेच धुम्रपान करणे शरीराला घातक आहे. त्यामध्ये तंबाखू, निकोटीन यासह विविध शरीर घातक रसायने असतात. एकट्या सिगारेट मध्ये जवळजवळ ३२ वेगवेगळी अपायकारक रसायने असतात. सिगारेट बिडीचे प्रत्येक पाकीट हे सेवन करणाऱ्याला मृत्यूच्या जवळ घेऊन जात असते. एक सिगारेट मनुष्याच्या जीवनातील आठ मिनिटे कमी करते. सध्या जगातील १ अब्ज लोक हे धुम्रपानाच्या विळख्यात सापडलेले असून प्रतिवर्षी किमान सहा लाख लोक मृत्युमुखी पडतात. धुम्रपानाचा सर्वात जास्त परिणाम आपल्या फुफ्फूसांवर होतो. धुम्रपान करणाऱ्यांना फुफ्फूसाचा कर्करोग होण्याची शक्यता असते. धुम्रपान हे फुफ्फूस कॅन्सरचे ९० टक्के कारण असते.

ताणतणावातून मुक्तता मिळवण्यासाठी, मन शांत करण्यासाठी, एकटेपणा घालविण्यासाठी, समस्या सोडविण्यासाठी, नकारात्मक गोष्टी विसरण्यासाठी, राग विसरण्यासाठी युवा वर्गातील मुले व्यसन करतात. मित्रांची संगत देखील एक कारण म्हणता येईल. मद्यपान व्यसनाचा घातक परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. मद्यपानामुळे यकृताचे विविध विकार उत्पन्न होतात यामध्ये हिपाटायटिस, यकृत संक्रमित होणे. यकृताचा सिरोसिस, लिव्हर फेल्युअर, लिव्हर कॅन्सर यासारखे यकृताचे विविध आजार उत्पन्न होतात. शिवाय मद्यपान करणाऱ्यांमध्ये हॅट ॲटक, किडण्या निकामी होणे, फुफ्फूसांचा कर्करोग, पोटाचा कॅन्सर, तसेच विविध आजार होण्याचा धोका अधिक असतो.

व्यसनाधीन झालेली तरूण पिढी व्यसनातून बाहेर काढण्यासाठी केवळ निबंध, कविता लिहून, धुम्रपानविरोधी शपथ घेऊन, जनजागृती करून चालणार नाही तर, मद्य विक्री करणारी दुकानेबंद करावी लागतील. तंबाखू, घुटखा, बिडी, सिगारेटला देखील आळा घालावा लागेल. आधी स्वतःहा प्रामाणिक राहून व्यसनाचा त्याग करावा लागेल. तेव्हा कुठे खऱ्या अर्थाने हा देश व्यसनमुक्त होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सत्तांतराचे द्ंवदव कधी संपणार...!!



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील आघाडी सरकारच्या सत्तांतराच्या महानाट्याला जवळपास सहा ते सात दिवस झाले आहेत. परंतु त्यात अद्यापही कुठली गोष्ट निर्णयाप्रत येत नाही. परंतु या सहा-सात दिवसात शिवसेना बंडखोर आमदारांकडून अनेक मुद्दे पुढे येत आहेत, आणि जवळपास या सर्व मंत्री आमदार यांचा विचार बघितला असता तर ती सगळी राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्यासोबत केलेल्या आघाडीच्या किंवा युतीच्या विरोधात आहे. हे स्पष्ट झाले आहे.**

कालच एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे मुंबई बॉम्बस्फोट करून निष्पाप मुंबईकरांचा जीव घेणाऱ्या दाऊदशी थेट संबंध असणाऱ्याशी हिंदुह्रदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना समर्थन कशी करू शकते ? यापुढे जाऊन अजूनही दुसरी गोष्ट म्हणजे वंदनिय बाळासाहेब ठाकरे यांना अटक करणारे सरकारमध्ये असून ते यांच्या मांडीला मांडी लावून बसतात. ह्या आणि असे अनेक गोष्टी खटकत असल्यामुळे आम्ही या निर्णयाप्रत आलो असे त्यांनी म्हटले आहे. गेल्या दोन चार दिवसात सोशल मीडियावर अनेक बंडखोर आमदारांच्या मुलाखती प्रसारित होत आहेत. त्यांच्यामध्ये एकच सूर आहे तो म्हणजे शिवसेनेच्या मंत्र्यांना कमी लेखणे, त्यांच्या विभागातील समस्यांकडे लक्ष न देणे ,डोळे झाक करणे. तसेच आमदारांना निधीसाठी कमतरता असणे आणि सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे ज्या पक्षांशी बाळासाहेबांच्या हयातीत कधीही समझोता झाला नाही बाळासाहेबांचा सतत विरोध होत होता अशाच पक्षांशी सत्तेसाठी महाआघाडी करून शिवसेनेने आपले महत्त्व कमी करून घेतले. दोन-चार दिवसात सोशल मीडियावरील मुलाखतीत शिवसेनेच्या तिकिटावर तीन- तीन चार- चार वेळी कोणी सहा वेळी निवडून आलेले आमदारांनी त्याविषयी तक्रारच मांडली आहे. त्यात चिमणराव पाटील, भरत गोगावले ,संजय शिरसाट ,दीपक केसरकर, भास्कर जाधव, तानाजी सावंत, उदय सावंत, अशी अनेक मंडळी आहेत.

स्वतःला शिवसेनेचा ढाण्या वाघ समजून घेणारे गुलाबराव पाटील तसेच दादा भुसे ही सर्व मंडळी एका ध्येयाने प्रेरित होऊन एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झालेले आहे. अर्थातच नकळत त्यांचाही या गोष्टीला पाठिंबा आहे हे उघड दिसते.

राज्यमंत्री शंभूराजे देसाई हे आपली व्यथा मांडताना म्हणतात आम्ही नावाला राज्यमंत्री होतो, परंतु आम्हाला काही अधिकार नव्हते. आम्ही ज्यांना पराभूत केले त्या राष्ट्रवादीच्या उमेदवाराला जास्त निधी मिळत होता.

मात्र अशाही परिस्थितीत एकनाथ शिंदे हे अद्याप पर्यंतही उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा न करता आपल्या मताशी ठाम आहेत. आणि याच बरोबर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार , जयंत पाटील, अजित पवार हे मात्र आम्ही शेवटपर्यंत शिवसेना साथ देणार, त्याच्या पाठीशी आहे, असा धीर मुख्यमंत्र्यांना देत आहे .आणि हीच गोष्ट हे सरकार अल्पमतात येण्यास कारणीभूत ठरत आहे. कुठल्याही परिस्थितीत आता आघाडी सरकारमध्ये आणि राष्ट्रवादीशी समझोता नाही मरण आले तरी बेहत्तर अशी भूमिका शिंदे यांनी घेतली आहे.

तरीही अजून उद्धव ठाकरे ,संजय राऊत ,आणि आदित्य ठाकरे, यांना शिंदे यांचा गट येऊन मिळेल अशी आशा आहे. आमचे दरवाजे त्यांना केव्हाही उघडे आहे असे ते वारंवार सांगत आहेत.

गोहातीहून चाळीस आमदारांची प्रेते येतील त्याची पोस्टमार्टेम होईल असे विधान संजय राउत यांनी केले. नंतर हे चाळीस आमदारांची जिवंत प्रेत आहेत, त्यांचे शरीर इथे येतील पण त्यांचा आत्मा मेलेला असेल येथे येथील तेव्हा ते मनाने जिवंत नसतील अशी सारवासारव नंतर केली. दुसरे विधान यांचा एक बाप नाही त्यांची अनेक बाप आहेत एका बापाचे असतील तर परत येतील. गोहातीला गेले हे चाळीस डुक्कर आहेत. आसाम मध्ये कामाख्या देवीचे मंदिर आहे तिथे है रेडे पाठवले आहे। बळी चढवायला. अनेक जिव्हारी लागणारे बोल संजय राऊत हे बोलले आहेत. मी पर्यावरण मंत्री आहे त्यामुळे घाण स्वच्छ करणे हे माझे कामच आहे तेव्हा ही घाण स्वच्छ केली आहे असे समजेल.

सत्तांतराचे नाटक सुरू झाल्यापासून एकंदरीत खासदार संजय राऊत आदित्य ठाकरे यांची वेळो वेळी बंडखोर आमदार विषयीच वक्तव्य बघितली तर परत हा खेळ जमून येईल अशी आशा आता तरी वाटत नाही. तरीही सत्तेच्या हव्यासापोटी राजकारणी मंडळी काय करतील याचा काही नेम नाही. कारण उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यामध्ये सभांमध्ये एकमेकाविषयी अनेक मुद्दे खालच्या पातळीवरुन भाषांणामध्ये जाहीरपणे बोलले जात होते. उद्धव ठाकरे यांनी परभणी च्या सभेत ही राष्ट्रवादीची शेण खाणरी आवलाद असे म्हटले होते, तर एका सभेत शरद पवार च्या सभेत कुत्री आल असताना पवार म्हणाले होते असू द्या, शिवसेनेचे कार्यकर्ते आहे. या उदाहरणावरून म्हणजे राजकारणात काहीही होऊ शकते हेही तितकेच सत्य आहे.

ज्येष्ठ राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर आपल्या विश्लेषणात म्हणतात उद्धवराव ज्यांची ख्याती दगाबाज म्हणून आहे अशा शरद पवारांकडे तुम्ही गेलात, तुमचे

प्रवक्ते तर म्हणतात शरद पवार हे माझे पहिले प्रेम आहे. मग शिवसेना किंवा बाळासाहेब हे त्यांचे पहिले प्रेम नाही. तर मग उद्धव ठाकरे त्यांचा दुसर प्रेम होऊ शकत नाही. ज्यांना तुम्ही शत्रू मानतात त्या देवेंद्र



फडणीस यांनी वारंवार सुचित केले होते की तुमच्या पक्षात तुम्हाला धोका आहे. तेच तुमचे खरे मित्र आहे. हे जे सर्व राजकीय नाट्य सुरू आहे हे मात्र सर्वसामान्य नागरिक आणि यांना मत देणारे मतदार आश्चर्याने आणि आवकपणे पाहत आहे. इकडे परत जर राष्ट्रपती राजवट लागली तर कोट्यावधी रुपयांचा खर्च परत होणार आणि तो जनतेच्या बोकांडी बसणार. दुसरी गोष्ट आता या परिस्थितीत एकंदरीत महाराष्ट्रातले वातावरण गढूळ झाले आहे,भयाण झाले आहे. आणि त्यामुळे बंदोबस्तासाठी, दिले जाणारे संरक्षण यामुळे त्यावरील भरपूर खर्च होत आहे. होणार आहे.

आमदार सुरत, गोहती, या ठिकाणी पंचतारांकित हॉटेलमध्ये राहून खूप मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. रोज त्यांच्यावर दहा लाखाचा खर्च होत आहे तसेच या आमदारांना प्रत्येकी पन्नास कोटी देण्यात येणार असल्याची वदंता आहे. हा खर्च हा खर्च कसा होतो आणि कोण करतय हाच मोठा प्रश्न जनतेला पडलेला आहे. अर्थातच लोकप्रतिनिधीवर खर्च होणारा पैसा हा जनतेच्या पैशातूनच होतो ही साधी गोष्ट आहे. मग जादा दिला जाणारा हा पैसा कुठून येतो आणि कोण खर्च करतो याचाही विचार करणे आवश्यक आहे. मात्र या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. यात सर्वसामान्य माणूस भरडला जातो..

मॅक्स उमन फेसबुकवर माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांची मुलाखत झाली त्यात ते म्हणतात...एकनाथ शिंदें पुढे एकच मार्ग आहे.असे ते किती दिवस

गोहातीला बसणार आहे. त्यांच्याकडे सदतीस आमदार असतील तर त्याची परेड सभापतु पुढे करायला हवी. तो अधिकार सभापतीला आहे .किंवा सरकार अल्प मतात आल्याने अविश्वास ठराव मांडला हवा. या सर्व घटनांचे फायनलसाठी स्पीकर आहे. पूर्वी हे केस कोर्टात चँलेंज करता येणार नाही असे होते. परंतु आता ती ओळ त्यातून काढली गेल्यावर आता हे कोर्टात चँलेंज करता येते.

आज ही जी खेळी आहे ती नरेंद्र, अमित, देवेंद्र, आणि भाजपाल यांची आहे. ते माझ्या एका पत्रकार मित्राला म्हणाले हे सरकार पहिल्यांदा पाडा, त्या पत्रकार मित्राच नाव मी सांगू शकत नाही. तो आल्यानंतर मला म्हणाला राज्यपाल मला असे म्हणाले हो.! अशा परिस्थितीत आघाडी सरकारने अलर्ट व्हायला हवे होते. भीमा कोरेगाव आणि लोहीया केस ह्या सरकारने रिओपन केली असती तर फडवणीसांच्या उड्या कधीच बंद झाल्या असत्या. आम्हीआधीपासूनच असं सांगत होतो कि मोदी सरकार सत्तेवर आले तर आपला देश बरबाद होईल. मलासुद्धा उद्धव ठाकरेंनी भेटीसाठी वेळ दिली नाही.

शरद पवार यांच्या राजकीय जीवनातील ही सर्वात मोठी कसोटी आहे. जर हे सरकार शरद पवार वाचवू शकले नाही तर देश पातळीवर त्यांची प्रतिमेला धक्का बसेल. म्हणून हे सरकार शरद पवार वाचवतील. असेही म्हणाले.तसेच सुप्रीम कोर्ट केव्हा काय आदेश करेल याचा नेम नाही. असेही ते म्हणाले. दोन हजार चौदा नंतर न्यायाधीशांची न्यायबुद्धी कुठे गेली हे समजत नाही. सुप्रीम कोर्टाला बाहेरून कोणी तरी चालवते हे स्पष्ट दिसते. फडणवीस हे अत्यंत धूर्त -कृर- छलकपटी- राजकारणी आहेत .त्यांनी बरोबर डाव साधला आणि शिंदे यांना ताब्यात घेतले. परंतु मला अजूनही खात्री आहे की तो डाव शरद पवार उधळून लावतील. राज्यपाल च सरकार विरोधात आहे म्हणुनच त्यांनी अद्याप पर्यंत राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्यांची नियुक्ती केली नाही. ते भाजपाल आहे.

आपली माणसं प्रशासनात यांनी बसवली नाही आणि त्यामुळे सर्व रसद बाहेर पुरवली गेली. अजून यांनी एडवोकेट जनरल बदलला नाही. सरकारी वकील बदलवला नाही.

सावरकर टिळक आणि गोवळकर हे या देशाचे दुश्मन आहेत त्यांनी हा फापटपसारा मांडला आणि गणपतीची पूजा शिवाजी जयंतीला काउंटर करण्यासाठी त्यांनी गणपती सुरू केला. या देशात भटमान्य ते लोकमान्य असे आहे असेही ते म्हणाले.

एकूणच आघाडी सरकार च्या बाजूने मुद्दे मांडून त्यांनी भारतीय जनता पक्ष विषयी आणि मागील काही घटनांचा

उल्लेख केला अशा वादग्रस्त घटनांचा उल्लेख केला नसता तरी चालले असते.

सरकार कुठल्याही पक्षाचे असो पण त्यांनी लोकांसाठी आणि त्यांच्या भल्यासाठी जे जे असेल ते करणे आवश्यक आहे. एवढे सांगितले असते तरी पुरेसे होते. वादग्रस्त मुद्दे मांडून परत परिस्थिती बिघडू शकते. सोमवारी संध्याकाळपर्यंत परिस्थिती बघता आमदारांकडे असलेल्या मंत्र्यां कडील खाते काढून त्याचा भार

ईतरांकडे दिला आहे. अर्थातच परिस्थिती अधिकच बिघडत चालली आहे. परत येण्याचे मार्ग बंद होत आहे. शिंदे यांच्या कोर्टात जाण्यामुळे त्यांना आमदारांना म्हणणे मांडण्यासाठी अकरा जुलै पर्यंत सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला आहे. मूळ शिवसेनेकडून प्रस्ताव आला तर विचार करू असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले .आज त्यांची कोर कमिटीची बैठक झाली.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता परत अकरा तारखे पर्यंत वेट अँड वॉच अशीच भूमिका राहील असे दिसते.....तोपर्यंत काय काय होते हे बघण्या शिवाय काय ? आता अशावेळी प्रसारमाध्यमांनीही संयमाची भूमिका घेऊन बातम्या देणे आवश्यक आहे जेणेकरून वातावरण बिघडणार नाही. थोडक्यात बातम्यांची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे. तूर्त एवढेच.....

# अस्थिर जनजीवनाचे हृदयद्रावक चित्रण : 'ते तेरा दिवस'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**पत्रकार ,कवी, लेखक अरविंद पाटील यांची 'ते तेरा दिवस' ही कादंबरी नुकतीच वाचली आणि वास्तवतेची जाणीव तीव्र झाली. एकूण ३१ प्रकरणं असलेली ही कादंबरी कोरोनानामक विषाणुमुळे अस्थिर झालेल्या जनजीवनाचे हृदयद्रावक चित्रण करणारी आहे.या कादंबरीचे निवेदन तृतीयपुरुषी असून कादंबरी वर्तमानकाळ ते भूतकाळ पुन्हा वर्तमानकाळ असा प्रवास करत पुढे जाते.**

मानवी जीवन म्हणजे सुख- दुःखाची मालिकाच असते. जे जे वाटयाला येईल ते स्वीकारून पुढे जाणे क्रमप्राप्त असते. मानवी मनाचे दुःख, वेदना, समस्या, प्रथा- परंपरा ह्या सगळ्याचं प्रतिबिंब आपल्याला साहित्यात दिसून येते. लेखक हा समाजाचाच एक भाग असतो. समाजात वावरताना त्याच्या दृष्टिने जे जे टिपले जाते ते शब्दातून अवतरते.. म्हणूनच साहित्याला समाजाचा आरसा म्हणतात.घड़णाऱ्या घटनांविषयी, अन्यायाविषयी त्याचं स्वतःचं असे एक मत किंवा प्रतिक्रिया तो व्यक्त करत असतो. साहित्यातून समाजाचे भीषण वास्तव प्रतिबिंबित झाले आहे.

लेखकाची लेखन शैली ओघवती आहे. प्रत्येक प्रसंग त्यांनी इतक्या संवेदनशीलतेने आणि बारकाईने टिपले आहेत की कादंबरी वाचताना प्रत्येकाला हे अनुभव आपलेच वाटतात. त्यातील पात्रांच्या जागी आपण स्वतःला पाहू लागतो,ही किमया लेखकाच्या लेखणीमुळे शक्य झाली. एखाद्या साहित्यकृतीशी एकरूप होणे म्हणजे आणखी वेगळं काय असतं नाही का ? कादंबरीतील प्रत्येक प्रसंग वाचताना तो प्रसंग, ते चित्र डोळ्यांसमोर तरलपणे उभे राहते.. इतके ते मनाला स्पर्शून जाते. २०२० पासून जगभरात कोरोनाने थैमान घालायला सुरूवात केली. संपुर्ण जग थांबलं. लॉकडाउन मुळे घराबाहेर जाणे बंद झाले. वाहतूक व्यवस्था बंद, दुकाने बंद. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. रुग्ण वाढू लागले. दवाखान्यात बेडची वानवा, औषधांचा काळाबाजार, ऑक्सीजनचा तुटवडा, रोज वाढणारे कोविड रुग्ण त्यात रोज होणारे मृत्यु त्यात अंत्यसंस्कारापासून वंचित राहावे लागले. कोणी कोणाकडे जात नव्हते वा येत नव्हते.. हे सगळं आपण सगळ्यांनी अनुभवले आहे. या प्रसंगातून आपण सगळे गेलो आहोत. कोरोनाची दाहकता काय आहे ह्यांची आपल्याला जाण आहेच. याच धर्तीवर आधारलेली ही कादंबरी आहे.

विजया ही ह्या कादंबरीची नायिका. कुटुंबवत्सल स्त्री ..कणखर, धीट, तितकीच हळवी .. एक आदर्श पत्नी,आई, नात, मूलगी, बहीण अशा सगळ्या नात्यात खरी उतरलेली अशी ही विजया. नवरा अरूण आणि मुलगा हितेश यांच्यावर नितांत प्रेम करणारी. शर्मिष्ठा ,मेघना ह्या विजयाच्या बहिणी तसेच मनोज भाऊ ,भावजय रेखा तसेच भाची तनया. दिनकरराव शर्मिष्ठाचे पती ,त्यांचा मूलगा तसेच मेघनाचे पती रोहित आणि त्यांच्या मुली, विजयाचे वडील रामराव आणि आजी ही सगळी पात्रे आपल्याला कादंबरीत भेटतात.

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या संकटात आपल्या माणसांना ख़ंबीरपणे साथ देणारी विजया ही खरी सुपरहिरो वाटते. बहीण शर्मिष्ठा हिला अचानक आलेलं वैधव्य, त्यात बहिण आणि तिचा मुलगा कोरोना पॉजिटिव अशात विजयाने खचून न जाता ती सर्वांना धीर देत राहिली. वडिलांवर आणि आजीवर जीवापाड़ माया करणारी विजयावर दुःखाचे डोंगर एका मागोमाग कोसळतात पण स्वतः कोलमडून न जाता स्वतःच्या कुटुंबाला ती आधार देते. घराचा आधार बनते. वडिलांना भेटायच्या ओढ़ीने कोलाड ते ठाणे स्कूटरवरुन प्रवास करणे विजयासाठी सोपे नव्हते.पण वडिलांना भेटण्याच्या इच्छेने व्याकुळ झालेली विजया तिच्या मनाशी किती ठाम आहे हे दिसून येते. 'ते तेरा दिवस' म्हणजे विजयासाठी अग्निदिव्यच होते. लागोपाठ एवढे आघात अनुभवावे लागले म्हणून एखादी व्यक्ती हिंमत हरली असती. पण विजया




ही कर्तव्यनिष्ठ, धीट, जिद्दी,वास्तव स्विकारुन कठोर प्रसंगाना तोंड देणारी स्त्री. हयातील प्रसंग वाचले की जाणवते की स्त्री ही शरीराने कोमल असली तरी धीट मनाची असते.कितीही संकटे आली तरी संपूर्ण घर ती सावरु शकते. ह्या स्त्री शक्तीची जाणीव यातून होते.स्त्रीचं एक वेगळंच रूप कादंबरीतून चित्रित केले आहे.

वेगवेगळ्या प्रसंगानी,घटनांनी भरलेले हे तेरा दिवस म्हणजे पदोपदी परीक्षाच जणू! कादंबरीतील काही प्रसंगात विजया भूतकाळातील सुखद आठवणीत रमताना दिसते. लहानपणीची विजया आणि वडील रामराव यांच्यातील गोड स्मृती खरेच सुंदररित्या मांडल्या आहेत. तसेच प्रेम आणि संस्कारांची शिदोरी देणारी आजीने सोसलेल्या यातनांचे स्मरण विजयाला होते. आजीची कणखर बाजू, तिचे कष्ट आणि शेवटच्या दिवसात झालेली तिची अवस्था ह्याचे वर्णन मनाला पिळवटून टाकणारे आहे.

स्त्रीच्या मनाची घालमेल, तिची काळजीवाहू वृत्ती, धीटपणा, खंबीरपणा, आणि तिच्या वास्तव स्विकारुन आयुष्य जगण्याच्या जिद्दीची ही कहाणी विषद करणारी ही कादंबरी असून प्रत्येक घरात अशी विजया पाहायला मिळते. कोरोनामुळे जनमानसावर ,त्यांच्या जीवनावर तसेच मानसिकतेवर काय परिणाम झाले ,याचे चित्रण ह्या कादंबरीत आहे.

कादंबरीचे मुखपृष्ठ आणि शीर्षक मनोवेधक आहे.तसेच जयश्री पाटील यानी मलपृष्ठावर कादंबरीचं थोडक्यात विवेचन मांडले आहे.ही कादंबरी म्हणजे समस्त मानवी मनाचं कथन आहे.

**( ते तेरा दिवस - कादंबरी / अरविंद पाटील / एच.एस. आर.ए. पब्लिकेशन्स.**

# उदारमतवादी अमेरिका पुराणमतवादाकडे ?



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**जगभरात महिलांचे हक्क नाकारणारे अनेक नियम कायदेशीररित्या कार्यान्वित आहेत. त्यातला एक म्हणजे सुदानमध्ये मुलींच्या लग्नाचे वय दहा आहे. माल्टासारख्या देशात कोणत्याही वयोगटातल्या मुलीचे अपहरण करून तिचा बलात्कार जरी केला आणि गुन्हेगाराने तिच्याशी विवाह केला, तर तो अपराध माफ आहे. मुस्लीम देशांचे तर काही विचारायलाच नको. अफगाण तालिबान्यांनी महिलांना 'ड्रायव्हिंग लायसन्स'वर बंदी आणली. पुरोगामित्व, उदारमतवाद, स्त्रीमुक्ती आदी चळवळींसाठी प्रसिद्ध असलेली अमेरिका आता पुराणमतवादाकडे झुकली आहे, असे म्हणायला हरकत नाही. अफगाण ते अमेरिका, दोन ध्रुव पण या न त्या परिक्षेपात महिलांच्या अभिव्यक्तीचे माणूसपणाचे प्रश्न कायमच!**

अमेरिकेत कोणत्याही महिलेला कायद्याच्या चौकटीत राहून गर्भपात करण्याचा घटनात्मक अधिकार होता आणि कोणतंही सरकार त्यावर बंदी घालू शकत नव्हतं. अमेरिकेतील एका खटल्यात सुप्रीम कोर्टाने ५० वर्षांपूर्वीच्या एका प्रकरणात देण्यात आलेला निकाल रद्द केला आहे. यामुळे अमेरिकेत आता महिलांना गर्भपात करण्याचा घटनात्मक अधिकार राहणार नाही. मेरिकी सर्वोच्च न्यायालयात रिपब्लिकन पक्षाचे प्राबल्य असल्यामुळे ६ विरुद्ध ३ अशा बहुमताने गर्भपाताचा अधिकार रद्द ठरवण्यात आला. या नव्या निर्णयात कोर्टाने स्पष्ट केलं की आता हा अधिकार घटनात्मक नाही, तसंच तो केंद्रीय (फेडरल) ही नाही. म्हणजेच आता अमेरिकेतली वेगवेगळी राज्य गर्भपातावर बंदी घालू शकतात. अमेरिकेत स्त्री म्हणून एका महिलेच्या मूलभूत अधिकाराबाबत काय सुरू आहे? आपल्या शरीरासंदर्भातले, लैंगिक परिमाण आणि परिणामासंदर्भातले निर्णय ती का घेऊ शकत नाही? स्त्री-पुरूष समानतेच्या आयामात आज अमेरिकन स्त्री कुठे आहे? आपल्या शरीराविषयी निर्णय घेण्याचे अधिकार फक्त महिलांना असावेत. यात समाज, शासन किंवा धर्म यापैकी कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. गर्भपाताला कायदेशीर परवानगी मिळणं हे स्त्री-पुरुष समानतेसाठी अत्यंत गरजेचं आहे. हा महिलांचा मूलभूत अधिकार असला पाहिजे.

मिसिसिपी राज्यातील एका खटल्यामध्ये नुकत्याच झालेल्या या निर्णयाचे मूळ आहे. १५ आठवड्यांच्या गर्भाचा गर्भपात करण्यावर मिसिसिपी राज्याने निर्बंध आणले. प्लॅन्ड पॅरेंटहूड विरुद्ध केसी खटल्याच्या निकालान्वये २४ आठवड्यांपूर्वी गर्भपात करण्याचा महिलेचा अधिकार अबाधित ठेवण्याची तरतूद अमेरिकन कायद्याच्या १४ व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आली होती. दरम्यान २०२० मध्ये तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यामूर्ती पदावर जस्टिस कॅमी बेरेट यांची नियुक्ती केली. मुळात गर्भपाताला ख्रिस्ती धर्मात बंदी आहे. 'गर्भपात करणे, हे नैतिक पाप आहे', असे कॅथॉलिक चर्चचे म्हणणे आहे. जस्टिस बेरेट या रुढीवादी असल्याने पूर्वीपासूनच गर्भपात अधिकाराच्या विरोधात होत्या. त्यांनी डॉब्जला हाताशी धरून रो आणि केसी यांच्या निकालाला आव्हान देत न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. १३ राज्यांनी गर्भपाताच्या अधिकारावर निर्बंध आणणारे नियम तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून सर्वोच्च न्यायालयाने मिसिसिपी राज्याने दिलेल्या निकालाची री ओढत अमेरिकन महिलांचा गर्भपाताचा अधिकार रद्द केला आहे.

हे करताना अमेरिकी सर्वोच्च न्यायालय म्हणते, की महिलांचा गर्भपाताचा अधिकार अबाधित ठेवण्याविषयी कोणताही स्पष्ट उल्लेख अमेरिकेच्या राज्यघटनेत नाही.

अमेरिकेतील ५० पैकी २६ राज्यांमध्ये या निर्णयानंतर तत्काळ बदल होऊ शकतात. येथे गर्भपात करणाऱ्या रुग्णालयांची संख्या कमी होऊ शकते. याचा अर्थ गर्भपात करायचा असेल तर महिलांना कदाचित हजार किलोमीटरहून जास्त दूर प्रवास करून दुसऱ्या राज्यात जावं लागेल. गर्भपात केंद्रांवर न जाता सेल्फ अबॉर्शनसाठीची औषधे वापरून गर्भपात करण्याकडे महिलांचा कल असेल अशीही एक शक्यता आहे. मात्र, अशा पर्यायांची माहिती नसलेल्या नागरिकांसाठी वैद्यकीयगर्भपातासारख्या पर्यायांबाबत जनजागृतीची गरज तेथील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. अमेरिका एवढा पुढारलेला देश असताना, त्यांच्या देशात ५० वर्षांपूर्वीच गर्भपाताचा अधिकार देणारा कायदा आला असताना ही वेळ आली आहे. या निर्णयाचे दूरगामी गंभीर परिणाम होणार आहेत. नव्या पिढीला याच्या परिणामांना सामोरे जावे लागणार आहे. महिला हक्क कार्यकर्त्यांचा




हा पराभव मानला जातोय आणि अनेक संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. गर्भपाताचा निर्णय हा महिलेच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याशी निगडित आहे. तो घेण्याचा अधिकार त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेला असता कामा नये. जोवर सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताचा हक्क महिलेला मिळणार नाही तोवर बेकायदेशीर गर्भपात होत राहतील आणि नको असलेल्या मातृत्वाचं ओझं खांद्यावर येऊन महिलांची प्रगती खुंटणार आहे. गर्भपाताला विरोध करणारे महिलेकडे माणूस म्हणून न बघता फक्त बाळ जन्माला घालायचं मशीन म्हणून बघतात. जन्म न झालेल्या बाळाच्या अधिकारापेक्षा महिलेचे अधिकार महत्त्वाचे असले पाहिजेत.

मुळात गर्भपातावर समूळ प्रतिबंध हवा, असे कुणीच म्हणणार नाही. गर्भपाताला प्रतिबंध करताना अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने 'जीवन जगण्याचा अधिकार प्रत्येकाला अगदी गर्भालाही आहे', 'जन्म घ्यायचा असलेल्या लक्षावधी निष्पाप जिवांचा या निर्णयामुळे जीव वाचणार आहे', असे म्हटले आहे. असे असले, तरी वर्ष २०१२ मध्ये आयर्लंडमधील भारतीय मूळच्या ३१ वर्षीय सविता हलप्पनवार यांचा नामोल्लेख करून गर्भपाताला सीमित अनुमती असणेही आवश्यक आहे, हे सांगावेसे वाटते. सविता गरोदर होत्या; परंतु काही वैद्यकीय गुंतागुंतीमुळे त्यांच्या जिविताला धोका निर्माण झाला. स्वतःचा जीव वाचावा, यासाठी त्यांनी डॉक्टरांना गर्भपात करण्याची विनंती केली; परंतु आयर्लंड येथील तत्कालीन कायदा त्यास अनुमती देत नसल्याने सविता यांना कुणी दाद दिली नाही. यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेचे पडसाद देशभर उमटले आणि वर्ष २०१८ मध्ये आयर्लंडमध्ये काही विशिष्ट प्रकरणांमध्ये गर्भपाताला कायद्याद्वारे अनुमती देण्यात आली. त्यामुळे अशा प्रसंगांमध्ये गर्भपात आवश्यकच आहे .

भारतात महिलांना कायद्यानं गर्भपाताचा अधिकारआहे. भारतात गर्भपातासाठीचा कालावधी जास्त आहे. २० आठवड्यांनंतरही सुरक्षितपणे गर्भपात केला जाऊ शकतो. त्यामुळं अटींची गरज नाही. शिवाय जर भ्रूण एखाद्या गंभीर आजारानं ग्रस्त असेल तर वैद्यकीय मंडळाच्या परवानगीनं त्यानंतर काही आठवड्यांनीही गर्भपात करता येऊ शकतो. गर्भपातासाठी भारतीय महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. गर्भधारणेच्या बाबतीत भारतात निर्णय महिलांचा नसतो, तर त्यांच्या पती किंवा कुटुंबाचा असतो. त्यामुळे साहजिकच तिने गर्भपाताचा निर्णय घेतला तर कुटुंबीयांचा विरोध होतो. गर्भपाताला सामाजिकदृष्ट्या कलंक समजलं जातं. याठिकाणी कुटुंब नियोजनाची साधनंही महिलांपर्यंत पोहोचलेली नाहीत. त्यामुळं बहुतांश महिला असुरक्षितरित्या गर्भपाताचा मार्ग अवलंबतात. महिला असुरक्षितपणे गर्भपात करतात. त्यामुळं त्याचे आकडे समोर येत नाहीत. लॅन्सेटच्या एका अभ्यासानुसार २०१५ मध्ये देशात १.५६ कोटी गर्भपात झाले होते. त्यापैकी केवळ, ३४ लाख प्रकरणं म्हणजेच २२ टक्क्यांपेक्षा कमी सरकारी रुग्णालयांमधली होती. सामाजिक आणि सांस्कृतिक मर्यादांमुळं महिलांना त्यांच्या अधिकाराचा वापर करता येत नाही. तसंच सुविधांच्या कमतरतेमुळं निर्माण झालेली दरी महिलांना या अधिकारांचा वापर करण्यात अडथळा बनते. मात्र सर्वात मोठं आव्हान, ही दरी कमी करण्याचं नसून, महिलांना मिळालेल्या अधिकाराचा वापर करता यावा, म्हणून सामाजिक पातळीवर बदल करण्याचं आहे.

# गोदाकाठच्या कविता : 'परभणीच्या मातीचे प्रतिबिंब'



भानुदास धोत्रे
संपर्क क्र. 7972625086

आधुनिक केसरी

**"गोदाकाठच्या कविता" ह्या काव्य संग्रहामध्ये एकूण त्र्याहत्तर प्रतिभावान शिक्षक कवींच्या कविता संकलित केलेल्या आहेत. बहुतांश कविनी आपला परभणी जिल्हा, जिल्ह्याची सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, परिस्थिती, येथे घेतले जाणारे पिकपानी, साजरे केले जाणारे सण, उत्सव, समारंभ, धार्मिक स्थळे, सर्वदूर वाहणाऱ्या नद्या, ह्या सर्वांना मध्यवर्ती ठेऊन काव्यलेखन केले आहे. परभणी जिल्ह्याचे वैभव आपल्या लेखणीमध्ये शब्दबद्ध करतांना प्रत्येक कवीने आपापल्या परीने खारीचा वाटा उचलला असुन त्यात कुठेही न्यून राहणार नाही याची जातीने दक्षता घेतली आहे.**

"गोदाकाठच्या कविता" हा परभणी जिल्ह्याच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी डॉ. सौ. सुचिता पाटेकर यांनी संपादित केलेला जिल्ह्यातील शिक्षकांच्या कवितांचा काव्यसंग्रह आहे. कोरोनाचा कठीण काळ. सगळीकडे लॉकडाऊन. सगळं जग स्तब्ध, चिंतेन ग्रासलेलं. भयावह परिस्थिती. चहुंकडे अंधाराचे मळभ दाटलेले. संकटाणं भयभीत झालेलं जनमानस. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भविष्याची स्पष्ट चिंता. अश्या ह्या विश्वव्यापी जीवघेण्या संकटाला सरळ शिंगावर घेत, संकटाचं संधित रूपांतर करीत, शिक्षणाधिकारी डॉ. सौ. सुचिता पाटेकर यांनी "शाळा बंद पण शिक्षण चालू" या उपक्रमांतर्गत संबंध जिल्ह्यामध्ये एक चळवळ राबविली. उमद्या, तरुण, होतकरू, कांहीतरी नवे करून पाहण्याची चुणूक असणाऱ्या शिक्षकांची एक मजबूत फळी उभी केली. त्यांच्या मदतीने संबंध जिल्ह्यामध्ये कडेकोट लॉकडाऊन असतानाही पालक व विद्यार्थ्यांचे सहकार्य घेऊन रांगोळी स्पर्धा, गितगायन स्पर्धा, अभिनय स्पर्धा, खास विद्यार्थ्यांसाठी पुस्तक समीक्षण स्पर्धा आयोजित केल्या. ह्या सर्वच गोष्टीवर कडी ठरावी असे विद्यार्थी आणि शिक्षकांचे तब्बल अठरा तास (दोन दिवस) चालणारे कविसंमेलन घेऊन एक नवा, अभिनव उपक्रम जिल्ह्याच्या नावे स्थापित केला.

ह्या अठरा तासाच्या कविसंमेलनाने त्यांचा आत्मविश्वास कमालीचा दुनावला. त्यांना एक सुंदर अशी कल्पना सुचली. संबंध जिल्हाभरातील शिक्षकांच्या कवितांचा एक समग्र असा संपादीत कविता संग्रह प्रकाशीत करण्याचा मनोदय त्यांनी शिक्षकांसमोर व्यक्त केला. त्यांच्या आव्हानाला संपूर्ण जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील कानाकोपऱ्यातील शिक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आपली स्वरचित काव्यरूपी कलाकृती जिल्ह्याला पाठवून दिली. छाननीअंती "गोदाकाठच्या कविता" हा सुरेख, सुंदर व संग्राह्य असा कविता संग्रह प्रकाशित करण्यात आला.

प्रस्तुत "गोदाकाठच्या कविता" ह्या काव्य संग्रहामध्ये एकूण त्र्याहत्तर प्रतिभावान शिक्षक कवींच्या कविता संकलित केलेल्या आहेत. बहुतांश कविनी आपला परभणी जिल्हा, जिल्ह्याची सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, परिस्थिती, येथे घेतले जाणारे पिकपानी, साजरे केले जाणारे सण, उत्सव, समारंभ, धार्मिक स्थळे, सर्वदूर वाहणाऱ्या नद्या, ह्या सर्वांना मध्यवर्ती ठेऊन काव्यलेखन केले आहे. परभणी जिल्ह्याचे वैभव आपल्या लेखणीमध्ये शब्दबद्ध करतांना प्रत्येक कवीने आपापल्या परीने खारीचा वाटा उचलला असुन त्यात कुठेही न्यून राहणार नाही याची जातीने दक्षता घेतली आहे. "गोदाकाठच्या कविता" या संग्रहात ज्याप्रमाणे जिल्ह्यातील विविध नामांकित कविंनी कविता लिहिल्या त्याचप्रमाणे कांही उदयोन्मुख नवकविंनीही आपले योगदान आपापल्या परीने देण्याचा प्रयत्न केला आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे "गोदाकाठच्या कविता" या संग्रहामधील बहुतांश कविंच्या कविता ह्या परभणी जिल्ह्याचा ऐतिहासिक व भौगोलिक वारसा अधोरेखित करतांना दिसतात. आपल्या सिद्धहस्त लेखणीमधून परभणी जिल्ह्याचे गौरवगान केंद्रिभूत ठेऊन लिखाण करणारांमध्ये - दिलीप देशपांडे चारठाणकर, महेश देशमुख, विनायक पौळ, संतोष सेलूकर, दिपक कुलकर्णी, राम जोशी, अनिल पत्की, संग्राम कुमठेकर, श्यामसुंदर धोंडगे, बी. एस. गायकवाड, इंदुमती कदम, अर्चना पौळ, श्रुतिका धुमाळ, सुरेखा महादसवाड, प्रणिता सोलापुरे, यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतात. परभणी जिल्ह्याची मुक्तपणे प्रसंशा करतांना आघाडीचे कवी श्री महेश देशमुख म्हणतात -


"माझा परभणी जिल्हा, आहे सुपीक जणांचा
जणु खजिना भरावा, कला साहित्य गुणांचा"

तर श्री संतोष सेलूकर आपल्या कवितेत पुढे म्हणतात -

"नका मानू उपेक्षित, हिरे येथले अनमोल
माती थोर इथली, काळी जमीन खोल"

असं म्हणत इथल्या काळ्या, कसदार, सुपीक भूमीचा गौरव करतात व इथल्या भूमीत जन्मलेला प्रत्येक सारस्वत हा अनमोल असूनही उपेक्षित असल्याची खंत व्यक्त करतात.

"गोदाकाठच्या कविता" या संपादीत काव्यसंग्रहामध्ये जसे परभणी जिल्हा केंद्रिभूत मानून लिखाण झाले आहे. तसेच इतरही पूरक विषयावर परंतु उल्लेखनीय असे लिखाण करणारेही बिनीचे शिलेदार कवी आपणास दिसुन येतात. त्यामध्ये प्रामुख्याने - आत्तम गेंदे, प्रेमेंद्र भावसार, रत्नाकर जोशी, शरद ठाकर, ज्ञानोबा डुकरे, रां. को. खेडकर, शंकर पांचाळ, माधव गव्हाणे, संतोष सकनूर,




घनश्याम सावकार, अशोक कुंभार, यशवंतराव देशपांडे, अरमान, जयश्री औताडे, सुमित्रा सबनीस यांचा नामोल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. उल्लेखनीय कविता लिहिणारे प्रेमेंद्र भावसार आपल्या 'शिक्षकांला सलाम' या कवितेत म्हणतात -

"विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा
उचलणाऱ्या शिक्षकांला सलाम.....!
या हृदयीचे त्या हृदयी पोहचवणाऱ्या
सुहृदय शिक्षकांला सलाम......!
विद्यार्थ्यांचा भावविश्वाला विश्वाचा
भाव देत शिकवणाऱ्या शिक्षकांला सलाम.....!"

तर सुप्रसिद्ध कवी रा.कों. खेडकर आपल्या कवितेत म्हणतात -

"दिवाळी सनात, लक्ष्मीपूजनाला
प्रवेशद्वाराच्या सुशोभनाला
केळीचे खांब खरेदीसाठी
उसळलेली गर्दी.....
खांब (पिलं) हातोहात संपलेले
रिकाम्या हाताने पांगलेले
माझ्यासारखे हिरमुसलेले कैक ग्राहक
शोधाशोध करून फिरू लागले
मी अपराध्यासारखा
निशब्द एकाच जागेवर उपऱ्यागत
स्वप्नातही वाटलं नव्हतं.....
विकत घ्यावी लागतील केळीची खांबं
काळ किती बदललाय "

अशी बदललेल्या काळाची दुखरी व्यथा जड अंतःकरनाने शब्दबद्ध करतांना दिसतात.

पुस्तकास शुभेच्छापर संदेशामध्ये श्रीमती निर्मलाताई विटेकर अध्यक्षा जि. प. परभणी, सौ.अंजलीताई गंगाप्रसाद अनेराव सभापती शिक्षण,क्रीडा व आरोग्य, आणि श्री एस. टी. टाकसाळे मुख्यकार्यकारी अधिकारी परभणी यांचे मौलिक पाठबळ लाभले आहे.

"गोदाकाठच्या कविता" या संग्रहाच्या शीर्षकाला व आशयाला अनुरूप अगदी सुरेख आणि समर्पक असे मुखपृष्ठ रेखाटन श्री कालिदास देशपांडे यांनी रेखाटले असुन, परिस प्रकाशनने हे पुस्तक अगदीच वाजवी किमतीत एक फेब्रुवारी 2021 रोजी प्रथम अवृत्तीच्या रूपाने रसिक वाचकांना अल्पावधित उपलब्ध करून दिले आहे

"गोदाकाठच्या कविता" ह्या संपादीत काव्यसंग्रहाच्या रूपाने परभणी जिल्ह्याचा ऐतिहासिक, भौगोलिक साहित्यिक व सांस्कृतीक असा अजोड ठेवा वाचक रसिकासाठी खुला झाला आहे. त्याचे निश्चितच मराठी साहित्यविश्वात स्वागत आहे.

# विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल करावी

## CSMSS पॉलीटेक्निक व परिवर्तन कॉम्प्युटर्स आयोजित गुणवंतांच्या कौतुक सोहळ्यात मानसी सोनवणे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिकत असतानाच आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल केल्यास यश मिळू शकते असे प्रतिपादन नुकतीच यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मानसी सोनवणे यांनी केले. परिवर्तन कॉम्प्युटर्स व सीएसएमएसएस पॉलीटेक्निक कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त 10-12 वी गुणवंतांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी त्या बोलत होत्या.

सोनवणे पुढे बोलतांना म्हणाल्या की 10 वी 12वीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणे हा केवळ यशाकडे जाणारी पहिली पायरी आहे. मात्र हे आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे आहेत या वेळी विद्यार्थ्यांनी आपली आवड व क्षमतेनुसार करिअरची निवड करावी तसेच अपयशाने खचून न जाता पुन्हा अधिक मेहनत व ध्येय ठरवून प्रयत्न केल्यास यश आपलेच असते.

यावेळी जेष्ठ कामगार नेते डॉ राम बाहेती, हॉटेल रामा इंटरनॅशनल चे व्यवस्थापक श्रीकांत जोगदंड, अभिनेते योगेश इरतकर, विक्रीकर विभागाचे उपायुक्त रवींद्र जोगदंड, सकाळ दैनिकाचे निवासी संपादक दयानंद माने यांनीही मार्गदशन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ गणेश डोंगरे परिवर्तनच्या उपक्रमाचे कौतुक करताना म्हणाले ज्या विद्यार्थ्यांच्या घरात शिक्षणाची परंपरा नाही, आर्थिक स्थिती बिकट आहे अशा स्थितीत दहावी, बारावीत सुवर्ण कामगिरी करून दाखवली आशा हिऱ्यांना शोधून




करिअरचे मार्गदर्शन देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणत आहेत. तसेच शिक्षणासाठी पैसे लागतात हा गैरसमज पालकांनी दूर करावा व आपल्या मुलांची आवड निवड ओळखून त्यांच्या वर फार दबाव न आणता करिअर घडवण्यात मदत करावी.

प्रस्ताविक भाषणात परिवर्तन चे संचालक मधुकर खिल्लारे यांनी गुणवंत कौतुक सोहळा आयोजित करण्यामागची भूमिका सांगितली ते पुढे बोलताना म्हणाले की 10 वर्षांपूर्वी 2 शाळेपासून या कौतुक सोहळ्याची सुरवात केली.आज तब्बल 25 शाळेतील विद्यार्थी व 12वी चे15 असे 40 विद्यार्थ्यांना ट्रॉफी व गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता हे पुस्तक देऊन कौतुक करण्यात आले. कामगारांच्या मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना पुढच्या करिअरच्या दिशा माहीत व्हाव्यात या साठी हा उपक्रम आयोजित करत असतो असे खिल्लारे यांनी सांगितले.

यावेळी संजय वानखेडे मुख्याध्यापक MIT शाळा, डी आर चव्हाण प्राचार्य सुधाकरराव नाईक ज्युनिअर कॉलेज, CA डी बी कचरे, गणेश वरकड मुख्याध्यापक मातोश्री जीवबेन पटेल माध्यमिक विद्यालय, विजय द्वारकुंडे मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, दीपमाला चव्हाण मुख्याध्यापीका स्वामी विवेकानंद विद्यालय, देवेन्द्र सोळंके मुख्याध्यापक महानगरपालिका शाळा व परिवर्तन च्या संचालिका वसुधा कल्याणकर यांची उपस्थिती होती.

या वेळी कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत डी आर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यकांची सुरवात छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन वैष्णवी गीते व गौरी काळे यांनी केले तर या आभार ज्ञानेश्वरी फफाळ हिने मानले. या कार्यक्रमासाठी तालमधुर्य संगीत क्लासेस चे विक्रम पवार टॉपर अकॅडमीचे संचालक प्रा.प्रकाश कांबळे, ममता बुक सेन्टरचे संचालक पवन कोटेचा यांनी विशेष सहकार्य केले.

मानसी सोनवणे यांचे यशाचे गमक ऐकण्यासाठी MIT शाळा, स्वामी समर्थ विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय माध्यमिक विद्यालय सह अनेक शाळेतील एकेक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष प्रधान दीपाली सावंत, सुरेश ठोंबरे, अजय चव्हाण, परमेश्वर बनसोडे, ओम बिडेकर, आशिलेश जैस्वाल, सानिका कानोडजे, आरती प्रधान, आकांक्षा मोरे, श्रद्धा गायके, सोनाली गायकवाड, संध्या मोरे, अश्विनी दामले, राजेश्री जाधव अश्विनी वाकळे, प्रयत्न केले.

# कापड दुकानाला आग लागून ३५ लाखांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** शहरातील धार रोडवरील हॉटेल विक्रांत शेजारी सत्यम कापड केंद्राला अचानक आग लागल्यामुळे दुकानातील तीस ते पसतीस हजार रुपयाचे नुकसान झाले. ही घटना सोमवारी रात्री १ वाजेच्या दरम्यान घडली अशी माहिती दुकानाचे मालक अनिल बन्सीलाल अग्रवाल यांनी पोलिसात दिली. पोलिसात दिलेल्या तक्रारी विजेच्या शॉर्टसर्किटने न्यू सत्यम कापड केंद्र या दुकानाला आग लागली. या दुकानात जवळपास ३० ते ३५लाख रुपयांचा कापडाचा माल, फर्निचर व इतर साहित्यासह सुटिंग, शर्टिंग,साड्या, ड्रेस मटेरियल, अंडरगारमेंट तसेच उच्च दर्जाची कपडे व बिल बुक यांचा समावेश होता. या वर्षांमधील कापड दुकानांमध्ये आग लागण्याची ही दुसरी घटना आहे. दरम्यान ही आग विझवण्यासाठी लोणार नगरपरिषद अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. दोन ते तिन तासानंतर या आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले मात्र तो पर्यंत मोठे नुकसान झाले.

यावेळी काँग्रेसचे जेष्ठनेते साहेबराव पाटोळे, शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी,न.प. उपाध्यक्ष बादशाह खान, डॉ. विक्रांत मापारी,नगरसेवक आबेद खान, राहुल मापारी तसेच गावातील नागरिकांनी



आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केले.आता कुठे कोरोना काळा नंतर परिस्थिती पूर्व पदावर येत असताना विजेच्या शॉर्टसर्किटने आग लागून झालेल्या नुकसानीमुळे अनिल अग्रवाल यांना मोठा धक्का दिला.या दुकानाला लागून असलेल्या बोरा इलेक्ट्रॉनिक्स व न्यू फॅशन पॉइंट दोन दुकानांनाही आगीची झळ बसली त्याचे ही या आगीत नुकसान झाले आहे.या घटनेची माहीती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. लोणार तहसीलदार सैफन नदाफ व तलाठी सचिन शेवाळे यांनी घटनास्थळी पोहोचून झालेल्या नुकसानाची पाहणी करून पंचनामा केला.

# अंबाजोगाईतील जिल्हा परिषद कन्या प्रा. शाळेत प्रतिसादात्मक पालक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** शनिवार 25 जून रोजी जिल्हा परिषद कन्या प्र.शा.ला अंबाजोगाई येथे पालक मेळावा संपन्न झाला. याप्रसंगी मेळाव्याची सुरुवात स्वामी दीपा दिलीपराव यांनी 'गंगुबाई निघाली मुंबईला...!' या विनोदी परंतु संस्काराची शिकवण देणाऱ्या नाट्यछटेने केली. ईयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी मले बाजाराला जायचं नाही....! ही छोटीशी नाटिका सादर केली. या नाटकातून प्लास्टिकच्या पिशवीचा वापर न करता कापडाच्या किंवा कागदी पिशवीचा वापर करावा असा उपदेश करणारी नाटिका सौ. दिपा स्वामी यांच्या सहकार्याने उत्कृष्टरित्या सादर केली.

श्री. सुधीर पाथरकर यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत मार्गदर्शन केले व उपस्थितीचे महत्वही सांगितले. वर्षा महाजन यांनी मुलींचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी घ्यावयाची काळजी व सेतू परीक्षेचे संदर्भात माहिती सांगितली. तसेच गटशिक्षण कार्यालयाचे विशेष शिक्षक शिंदे प्रकाश यांनी शाळेतील एकंदरीत कामाबद्दल कौतुक केले. तसेच स्वामी दीपा यांनी सादर केलेल्या नाट्यछटांविषयी अभिनंदन केले. शाळेतील एकूण कामकाजाबाबत खूप समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषद शाळेतील कार्याचे महत्त्व विषद केले. शाळेचे मुख्याध्यापक कदम सर यांनी पालकांनी आपल्या पाल्याची काळजी कशाप्रकारे घेतली



पाहिजे. प्रत्येक कामाचं गांभीर्य कसं घेतलं पाहिजे. शिवाय विद्यार्थ्यांना शिक्षणात पालकांचे सहकार्य आवश्यक आहे हेही सांगितले व बँकेमध्ये खाते उघडणे संदर्भात सूचना दिली.

पालकांनी कन्या शाळेच्या अध्यापनाबाबत आणि मुलींच्या घेतल्या जाणाऱ्या सर्वांगीण काळजीबाबत समाधान व्यक्त करत मनोगत व्यक्त केले.

अनेक पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील सर्व शिक्षकांच्या अध्यापन व संस्काराबाबत ते खूप समाधानी असल्याचे मत व्यक्त केले व विद्यार्थी घडविण्यास जिल्हा परिषद शाळा खरंच खूप प्रभावी कार्य करू शकते असेही पालकांनी आपले मत व्यक्त केले. या मेळाव्यास या वर्षातील पहिलाच पालक मेळावा असूनही अपेक्षापेक्षा अधिक पालक उपस्थित होते. याही पुढे वेळोवेळी आम्ही पालक मेळाव्यास उपस्थित राहू असेही आश्वासन दिले. शेवटी चित्रकला शिक्षक खाडे सर यांनी आभार प्रदर्शन केले.

या पालक मेळाव्यास गटशिक्षण कार्यालयाचे विशेष शिक्षक प्रकाश शिंदे तसेच श्रीमती घोडके उपस्थित होत्या व येथील सर्व शिक्षक वृंद व महिलापालक तसेच पुरुषपालकही उपस्थित होते.

एकंदरीत कार्यक्रम उत्कृष्ट झाला. कार्यक्रमाची रंगत वाढावी आणि पालकांची रंजक वाढावी म्हणून सौ.कल्याने सोनाली व श्रीमती.कुलकर्णी सुजाता यांनी रांगोळी व ईतर सजावटीने शाळेचा परिसर सुसज्ज सजवला. तर सेवकांनी त्यासाठीची संपूर्ण पूर्वतयारी केली. श्री. गवळी यांनी कार्यक्रमाची छायाचित्र टिपली. श्री.देवकत्ते सर यांनी एकदम शिस्तीत बैठकव्यवस्था केली. तर हा मेळावा यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षकवृंदांसह क्लार्क, सेवक वर्गानेही परिश्रम घेतले.

# ओबीसी जनगणनेचा लढा संसदेपासून सडकेपर्यंत लढाईसाठी आज ॲड.अंजलीताई साळवे अंबाजोगाईत

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** ओबीसींच्या प्रलंबित प्रश्न-मागण्या याकडे राज्य-केंद्र सरकार अशा दोन्ही सरकारांचे होत असलेले दुर्लक्ष आणि एकमेकांवर ढकलाढकली करण्यामुळे आज राज्यातील-देशातील ओबीसी समाज आपल्या मूलभूत अधिकारांपासून हक्कांपासून मोठ्या प्रमाणात वंचित असल्याने वेगवेगळ्या स्तरांमध्ये आरक्षण नसल्यामुळे ओबीसी समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून हा समाज राजकीय कुरघोड्या मुळे चांगला दुखावला गेला आहे. त्यामुळे आता कुठल्याही परिस्थितीत गप्प बसून चालणार नसल्याने

आता नाही तर कधीच नाही...!

या अनुषंगाने ही लढाई आता दिवसेंदिवस तीव्र केल्याशिवाय आणि संपूर्ण देशातील समाज पूर्णतः ऐकवटल्याशिवाय ओबीसीचे हक्काचे आरक्षणही मिळणार नाही आणि प्रलंबित प्रश्न सुटणार नाहीत. अशामुळे आपणास आता वेळेत एकत्रित येणे नितांत गरजेचे आहे. या एका तत्त्वावर माजी समुपदेशक तथा कायदेविषयक सल्लागार राष्ट्रीय महिला आयोग नवी दिल्ली च्या नागपूर येथील असणा-या ॲड.अंजली ताई साळवे यांनी चांगलीच कंबर कसली असून त्या महाराष्ट्र राज्यासह देशभरात ओबीसी संबंधित लढाया कशा लढल्या पाहिजेत या संबंधित व्याख्याने देत आहेत. याच धरतीवर त्या बुधवार दिनांक 29 जून 2022 रोजी अंबाजोगाई येथे येत असत असून न.प.कार्यालया शेजारील मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात सायं. ५ वा. होणा-या या कार्यक्रमाला तथा व्याख्यानाला ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय ओबीसी परिषद अंबाजोगाईचे अध्यक्ष ॲड. किशोर गिरवलकर यांनी केले आहे.

ओबीसी का ऐलान, पाटी लगाओ अभियान...!

सन 2022 मध्ये सरकारने राष्ट्रीय जनगणनेचा जो निर्णय घेतला त्यामध्ये ओबीसी-OBC ( VJ/NT/SBC ) चा कॉलमच नसल्यामुळे आमचा या जनगणणेत समावेश नाही. त्यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरात......, ओबीसी का ऐलान, पाटी लगाओ अभियान....! या उपक्रमान्वये देशात जागोजागी ओबीसी आरक्षणासंदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने पाटी लावण्याची मालिका सुरू करण्यात येणार आहे.

तेंव्हा आता हा लढा गल्ली ते दिल्ली म्हणजेच संसदेपासून सडके पर्यंत असा मोठ्या स्वरूपात कसा उभा करायचा आणि हे यश पदरात पाडून घेण्यासाठी ईतरही काय-काय महत्वपूर्ण उपाययोजना कराव्या लागतील याबाबतीत अगदी सविस्तर यथोचित मार्गदर्शनपर व्याख्याने सध्या सर्वत्र ॲड.अंजलीताई साळवे, नागपूरकर या सर्वत्र देताहेत. तेंव्हा याच अनुषंगाने त्या आपल्या अंबाजोगाईतही येत असल्याने सर्वांनी या बहुमोल मार्गदर्शनपर व्याख्यानाचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन या आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.किशोर गिरवलकर यांनी केले आहे.



# भोकणगाव येथील सोसायटी चेअरमनपदी वाल्मीक खरे तर व्हाईस चेअरमनपदी बाळु म्हस्के यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील भोकणगाव येथील वि वि का सोसायटी निवडणूक बिनविरोध निवड करण्यात आली, यावेळी गणपतराव खरे, वसंतराव खरे, अशोक म्हस्के, अविनाश खरे, लक्ष्मीकांत खरे, मधुकर खरे, यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली.

चेअरमनपदी वाल्मीक खरे व व्हाइस चेअरमनपदी बाळू म्हस्के यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संचालक पदी गुलाबराव खरे, संजय खरे, आप्पाराव जाधव, तुकाराम चव्हाण, नितिन खरे, सोमनाथ खरे, स्वाती खरे, प्रवीण नलावड़े यांची निवड करण्यात आली. यावेळी सचिन खरे, ईश्वर खरे, संदीप खरे यांनी परीश्रम घेतले आणि निवडणुन आलेल्या चेअरमन व्हाईस चेअरमण व सदस्य यांचे सर्व गावकऱ्यानी अभिनंदन केले.

# माधव सटवाणी यांना उद्या कालिदास पुरस्कार प्रदान

## कोकण मराठी परिषद, गोवा उपक्रम; डॉ. महेश खरात यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** कोकण मराठी परिषद गोवा या संस्थेतर्फे दरवर्षी कविकुलगुरू महाकवी कालिदास पुरस्कार यंदा गोव्यातील ज्येष्ठ कवी माधवराव सटवाणी यांना जाहीर झाला असून येत्या ३० जून रोजी सायंकाळी ३.३० वाजता होणाऱ्या इन्स्टिट्युट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात होणाऱ्या समारंभात औरंगाबाद येथील डॉ. महेश खरात यांच्या हस्ते हा पुरस्कार माधव सटवाणी यांना प्रदान करण्यात येईल. पुरस्काराचे हे चौदावे वर्ष असून यापूर्वी गोव्यातील अनेक नामवंत साहित्यिकांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

माधव सटवाणी हे वाळपई तालुक्यातील वेळूस येथील असून गेली दशकांपासून त्यांचे कविता व इतर लेखन सातत्याने सुरू आहे. त्याचे 'निमग्न' आणि 'एक शुभ्र टिंब' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या तिसऱ्या मराठी कवितासंग्रहाचे प्रकाशन लवकरच करण्यात येणार आहेत. इंग्रजी वाङ्मय आणि सौंदर्यशास्त्र हे विषय घेऊन एम. ए.आणि एम. एड. असलेले प्रा. सटवाणी यांनी सत्तरी तालुक्यात १९६५ ते २००५ या काळात चार दशके ज्ञानदानाचे कार्य केले आहे. निवृत्तीनंतर सध्या ते पूर्णवेळ लेखन करत आहेत.

त्यांचे 'निमग्न' (१९९९) आणि 'एक शुभ्र टिंब' (२०१०) असे दोन मराठी कवितासंग्रह असून, २०१७ मध्ये 'फिफ्टी एव्हरग्रीन पोएम्स ऑफ माधव सटवाणी' हा त्यांच्या मराठी कवितांचा मोहनराव कुलकर्णी यांनी अनुवादित केलेला संग्रह प्रकाशित झाला आहे.या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ताळगाव येथील माधव राघव प्रकाशनने पणजीत आयोजित केला होता. त्यांनी पहिली कविता १९६२ मध्ये इयत्ता दहावीत शिकत असताना केली. १९६९ साली त्यांनी काही कविता लेखन केले. परंतु १९७२ पासून त्यांचे कवितालेखन सातत्याने सुरू आहे.

त्यांनी ललित लेखन, काव्य समीक्षा लेखनही केले आहे. ही दोन्ही पुस्तके तसेच ललितबंध (लेखसंग्रह) आम्ही नाटक शिकतो (बालनाट्य), बा. भ. बोरकरांच्या कविता रसग्रहण तसेच कथासंग्रह आणि कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

त्यांनी १९७४ मध्ये साहित्य कलोपासक मंडळाची स्थापना केली आहे. १९८२ मध्ये ते या मंडळाचे अध्यक्ष झाले. 'बिल्वदल, साखळी' या संस्थेतर्फे ३ डिसेंबर, २०१३ रोजी आयोजित मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. त्यापूर्वी २००८ मध्ये वाळपईत भरलेल्या 'युवा मराठी साहित्य समेलना'तील कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. याशिवाय गोव्यात विविध ठिकाणी झालेल्या कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. इचलकरंजी येथील दै. महासत्ता आणि कोल्हापूर येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, महाराष्ट्र गोव्यातील दैनिके तसेच दिवाळी अंकातून त्यांच्या कविता सातत्याने प्रकाशित होत आहेत.

विष्णू सूर्या वाघ यांनी कला अकादमीतर्फे २०१६ मध्येआयोजित केलेल्या 'काव्यहोत्र' या राष्ट्रीय स्तरावरील कविसंमेलनात ते निमंत्रित कवी म्हणून सहभागी झाले होते. त्यांना अकोला महाराष्ट्र येथील 'अंकुर साहित्य संघा'चा 'कवी बी' साहित्य पुरस्कार बेळगाव येथील 'वाङ्मय चर्चा मंडळा'चा कवी कृ. ब. निकुंब साहित्य पुरस्कार, कुलकर्णी साहित्य प्रतिष्ठानचा 'शारदीय साहित्य पुरस्कार', 'बिल्वदल, साखळी' या संस्थेचा 'पं. महादेव शास्त्री पुरस्कार', नाशिक येथील 'नाशिक कवी संस्थे'चा 'कुसुमाग्रज पुरस्कार' तसेच उगवे-पेडणे गोवा येथील 'यशवंत साहित्य राज्यस्तरीय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. डॉ. साहेबराव खंदारे आयोजित 'आशिएन पोएट्री' या विश्वव्यापी ऑनलाईन कविसंमेलनासाठी त्यांच्या दोन कवितांची निवड झाली आहे.

अडवई -सत्तरी, गोवा येथील नेताजी सुभाषचंद्र युवक मंडळ, बेळगाव येथील 'माय मराठी संघा'तर्फे २०१४ मध्ये, २०१८ मध्ये वाळपई सार्वजिनक गणेशोत्सव मंडळातर्फे, २०१९ मध्ये वाळपई येथील गोमंतक मराठी साहित्य परिषदेतर्फे त्यांचे सत्कार व गौरव झालेले आहेत.

डॉ. महेश खरात यांचा अल्पपरिचय

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर येथील विनायकराव पाटील महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे ते प्रमुख आहेत. त्यांचा 'ओळ तुझी माझी' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला असून त्याला आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'बुर्गांट' ही कादंबरी प्रकाशित झालेली आहे. तसेच त्यांचे समीक्षाविषयक अनेक ग्रंथ प्रकाशित आहेत. ते पी. एचडी साठीचे मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थ्यांनी पी.एचडी पदवी मिळवली आहे. अनेक संशोधन प्रकल्पासाठी ते कार्यरत आहेत.

दोन पुस्तकांचे प्रकाशन

या कार्यक्रमात माजी शिक्षणाधिकारी ज. अ. रेडकर यांच्या 'एक प्रवास आठवणींचा' या लेखसंग्रहाचे तसेच डॉ. गुरुदास नाटेकर यांच्या 'हिरव्या रानात' या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे डॉ. महेश खरात यांच्या हस्ते करण्यात येईल.

आषाढस्य प्रथम दिवसे - कविसंमेलन

महाकवी कालिदासांनी आषाढाच्या पहिल्या दिवशी 'मेघदूत' या महाकाव्याची निर्मिती केली. त्याच दिवशी कालिदास जयंती साजरी केली जाते. कोकण मराठी परिषद, गोवा या संस्थेतर्फे 'आषाढस्य प्रथम दिवसे' हे कविसंमेलनही घेण्यात येते. या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद येथील कवयित्री प्रिया धारुरकर आणि प्रिया कालिका बापट (गोवा) या असतील. या कविसंमेलनात गोव्यातील नामवंत आणि नवोदित कवी- कवयित्री सहभागी होणार आहेत. या कविसंमेलनात औरंगाबाद येथील डॉ. रामकृष्ण दहिफळे आणि डॉ. संतोष देशमुख हे खास निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत.

प्रिया धारुरकर यांचा परिचय

प्रिया धारुरकर या साहित्यिका आणि स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्श आहेत. त्यांचे 'विदेही' आणि 'अंग भरून वाहणाऱ्या पान्ह्यातून' हे दोन कवितासंग्रह तसेच 'घन दाटले स्वर' हा ललितलेख संग्रह प्रकाशित आहेत. महाराष्ट्रातील विविध दिवाळी अंकातून त्यांचे लेखन प्रकाशित होत आहे. 'मुक्त सृजन' या साहित्यिक पत्रिकेच्या त्या सहसंपादिका आहेत.



औरंगाबादेतील राणानगर, विद्यानगर येथे वृक्ष रोपानांचा कार्यक्रम शिवसेना पुर्व विधान संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती राजु वैद्य यांच्या हस्ते करण्यात करण्यात आले. यावेळी राजु वैद्य बोलताना वृक्षांची संगोपन करण्यासाठी सर्व नागरिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले, येथे वेगवेगळ्या प्रकारच्या १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी तेथील प्रत्येक नागरिकांना प्रत्येकी १ झाडची काळजी घेण्याची जबाबदारी देण्यात आली. तेव्हा भाकरे काका, संजय राणा, चैतन्य पाटील, विजय भोगावकर, संतोष केंद्रे, नंदकुमार पाठक, किर्तीकुमार राणा, भाकरे काकू, अल्का राणा, रुचिता पाटील, श्वेता गावडे, मनाली मुथा, सारिका म्हैसेकर, रजनी वाटवे, मंजू कोल्हे, अनुजा भाकरे, सीमा जोशीं, उमा सुगावकर, प्रांजल कुलकर्णी, स्नेहा चौधरी, अखिल शेख, प्रकाश धुर्वे, राम केकान, भरत ढवळे, ईश्वर शिंदे, संदीप अहिरे, राज नीळ, महेश बोटवे, पराग कोयाळकर, बंटी कचकुरे, पियुष कोयाळकर, शुभम साळवे आदी उपस्थित होते.

# श्री गजानन महाराज पालखीतील वारकऱ्यांसाठी अ.भा.वि.प.ने राबवला माऊलींची पदसेवा व आरोग्य सेवा उपक्रम...!

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अंबाजोगाई, सेवार्थ विद्यार्थी व मेडिव्हिजन च्या विद्यार्थ्यांनी एकत्रित येत श्री गजानन महाराजांच्या पालखीतील वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गोपाळराव चौसाळकर, अ.भा.वि.प. शहर अध्यक्ष प्रा. डॉ.नाथराव गरजाळे, शहर मंत्री मोहिनी सोळंके, कार्यक्रम प्रमुख वेदांत ढवळे, अ.भा.वि.प. लातूर विभाग संघटन मंत्री ज्ञानेश्वर उदेवाल, शहरातील प्रतिष्ठित व्यापारी प्रदीप झरकर आणि साईनाथ उपरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.गोपाळराव चौसाळकर यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेत असताना आपण या समाजाचे देणे लागतो याचे भान आपल्याला असले पाहिजे आणि आपलं कार्य हे ईश्वरी कार्य आहे. आपण फक्त निमित्त म्हणून काम करत असतो असे प्रतिपादन केले. या शिबिरात डॉ. प्रशांत घुले व डॉ.आयुष्य बंग यांच्या मार्गदर्शनाखाली मेडीविजन व अ.भा.वि.प. कार्यकर्त्यांनी कार्य केले.



# भोकर शहरातील रस्ते घेणार मोकळा श्वास..!

## मुख्याधिकारी प्रियंका टोंगेनी घेतला पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील मूख्यरस्त्याच्या दूतर्फा रोडवर मागील अनेक दिवसांपासून अतिक्रमण झाल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. रस्त्याचे रूंदिकरण झाल्यावरहि वाहतुकीची कोंडी होत आहे. या सम्यातुन सुटका करण्यासाठी नागरिकांनी पालीकेला सहकार्य करावे. लवकरच शहर अतिक्रमण मुक्त करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी सौ.प्रियांका टोंगे यांनी दिली आहे.

भोकर तालुका महारष्टाच्या नकाशावर ठळकपणे उमटून दिसावा यासाठी पालकमंत्री अशोक चव्हाण यांनी नवनवीन प्रयोग केले आहेत. बरीच कामे प्रगतीपथावर आहेत ते लवकरच मार्गी लागतील. शहरातील नगरपालिका हि कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात आहे. पालीकेला लागणारा आवश्यक निधी देण्यास पालकमंत्र्यांनी कसलीच कसूर ठेवली नाही. पालीकेत मागील काळात बराच "राडा" झाला त्यामूळे नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आता निवडणूका तोंडावर आल्याने जनतेत असलेली "खदखद" दूर करण्यासाठी त्यांना बराच आटापिटा करावा लागणार आहे.शहरातील रस्ते अरुंद झाल्याने नियमित वाहतूकीची कोंडी निर्माण होत असे. यावर तोडगा काढण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण करून सिमेंट रस्ता तयार करण्यात आला आहे. भोकर बसस्थानक परिसर, शिवाजी चौक, आंबेडकर चौक, कीनवटरोडवर "वाहनथांबा" केला जातो आहे तर व्यापारी आपले साहित्य ठेवून अतिक्रमण केल्याने वाहनधारकांना व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन



करावा लागतो आहे. पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आहे. अशा समस्यांतुन सुटका करण्यासाठी पालिकेने ऊशीरा का होईना अतीक्रमणमूक्त शहर करण्यासाठी निर्णय घेतला आहे. अतीक्रमण धारकांना पहिले सुचना केली असून सहकार्य करावे अन्यथा कायदा हातात घ्यावा लागेल असे ठणकावून सांगितले आहे.

### मुख्याधिकारी ऊतरल्या रस्त्यावर

मागील दोन दिवसांपूर्वी पालीकेच्या वतीने शहरातील रस्यावर झालेले अतिक्रमण काढून घ्यावे. अन्यथा पालीका पुढाकार घेईल असे ध्वनीक्षेपनाव्दारे सांगण्यात आले. सोमवारी (ता. २७) येथील मुख्याधिकारी प्रियांका टोंगे आणि त्यांचे कर्मचारी, पोलीस विभागाच्या कर्मचाऱ्यांना समवेत घेऊन अतिक्रमण काढण्यासाठी सरसावले आहेत.

### पार्कींगचे तीन तेरा

पालीकेनी अतिक्रमण हटविले असले तरी शहरातील मुख्य रस्त्यावर दूचाकी, चारचाकी वाहने उभी केली जातात त्यामुळे मोठा अडथळा होतो आहे. वाहनधारकाना शिस्तीचे धडे देण्यासाठी "पार्कींगची" व्यवस्था करणे गरजेचे आहे. संबंधीत विभागाने त्वरीत पाऊले उचलावीत अशी जनतेची मागणी आहे.

